सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - ११३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ सोमवार दि. २६ मे २०२५ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## ‘जो कुंकू पुसेन, त्याचा खात्मा निश्चित’, दाहोद येथून पंतप्रधान मोदींचा पाकिस्तानला थेट इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६दाहोद गुजरात**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते सोमवारी (२६ मे, २०२५) गुजरातमधील दाहोद येथे अनेक विकास कामांचे उद्घाटन करण्यात आहे. यावेळी त्यांनी उपस्थितांना संबोधित केले. ते म्हणाले, ’आज देश निराशेच्या गर्तेतून बाहेर पडत विश्वासाच्या प्रकाशात तिरंगा फडकवत आहे. तसेच, दहशतवाद्यांना इशारा देत ते म्हणाले, ’जो कुणी आमच्या माता भगिणींचे कुंकू (सिंदूर)पुसण्याचा प्रयत्न करेन, त्याचा खात्मा निश्चित आहे.’

पंतप्रधान मोदी म्हणाले, जम्मू आणि काश्मीरमधील पहलगाममध्ये दहशतवाद्यांनी जे काही केले, भारत गप्प बसू शकेल का? मोदी गप्प बसू शकेल का? विचार करा. जर कोणी आपल् माता-भगिणींचे कुंकू (सिंदूर) पुसण्याचा प्रयत्न केला, तर त्याचा खात्मा निश्चित आहे. म्हणूनच, ऑपरेशन सिंदूर ही केवळ लष्करी कारवाई नाही. तर ती आपल्या भारतीय मूल्यांची आणि आपल्या भावनांची अभिव्यक्ती आहे. दहशतवाद्यांनी १४० कोटी भारतीयांना आव्हान दिले होते.



म्हणूनच मोदीने तेच केले, ज्यासाठी देशवासीयांनी त्याला प्रधानसेवकाची जबाबदारी दिली.’

मोदी पुढे म्हणाले, मोदीशी पंगा घेणे एवढे महागात पडू शकते, असा विचार कधी स्वप्नातही दहशत पसरवणाऱ्यांनी केला नसेल. त्यांनी २२ तारखेला जो खेळ खेळला होता, तो आम्ही हाणून पाडला. आमच्या सैन्याने पाकिस्तानी सैन्याला पार धूळ चारली. आम्ही देशाच्या सैन्याच्या शौर्याला सॅल्यूट करतो.

देशाच्या प्रगतीसाठी जे काही आवश्यक आहे, ते आपण भारतातच बनवले पाहिजे, ही काळाची गरज आहे. आज आपण खेळण्यांपासून ते लष्करी शस्त्रांपर्यंत सर्व काही जगभरातील देशांमध्ये निर्यात करत आहोत. आज भारत रेल्वे, मेट्रो आणि त्यासाठी आवश्यक असलेले तंत्रज्ञान बनवतो आणि जगाला निर्यातही करतो. नुकताच हजारो कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन आणि पायाभरणी करण्यात आली. काही लोकांना शिव्या देण्याची सवयच लागली आहे. ते म्हणायचे की निवडणुका आल्या, मोदीजींनी पायाभरणी केली, काहीही होणार नाही. आज, तीन वर्षांनंतर, या कारखान्यात पहिले इलेक्ट्रिक लोकोमोटिव्ह बनून तयार झाले आहे. आज त्याला हिरवा झेंडा दाखवण्यात आला, असेही मोदी म्हणाले.

## चिंताजनक! देशातील कोरोना एक्टिव्ह रुग्णांची संख्या १००० पार; महाराष्ट्रात सर्वाधिक रुग्ण

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ मुंबई**

दिल्लीत पुन्हा एकदा कोरोना व्हायरसच्या रुग्णांमध्ये मोठी वाढ दिसून येत आहे. आरोग्य विभागाच्या आकडेवारीनुसार, दिल्लीत सध्या कोरोनाचे १०४ एक्टिव्ह रुग्ण आहेत. गेल्या एका आठवड्यात ९९ नवीन रुग्ण आढळले आहेत जे आरोग्य प्रशासन आणि नागरिकांसाठी चिंतेचा विषय बनले आहेत. तसेच संपूर्ण देशात कोरोना एक्टिव्ह रुग्णांची संख्या एक हजाराच्या पुढे गेली आहे.



आरोग्य विभागाने दिलेल्या माहितीनुसार, केरळमध्ये सर्वाधिक ४३० रुग्ण आहेत, त्यानंतर महाराष्ट्र २०९ आणि दिल्ली १०४ एक्टिव्ह रुग्णांसह तिसऱ्या क्रमांकावर आहे. तर कर्नाटकात ३४ नवीन रुग्ण आढळले आहेत. यासह राज्यातील एक्टिव्ह रुग्णांची संख्या ४७ झाली आहे. गुजरातमध्ये ७६ नवीन रुग्ण आढळले आहेत, आता राज्यातील एक्टिव्ह रुग्णांची संख्या ८३ झाली आहे.

हरियाणामध्ये ८ नवीन रुग्ण आढळले आहेत. यासह राज्यातील एक्टिव्ह प्रकरणांची संख्या ९ झाली आहे. तर राजस्थानमध्ये ११ नवीन प्रकरणं नोंदवली गेली आहेत, एक्टिव्ह रुग्णांची संख्या १३ झाली आहे. याशिवाय पश्चिम बंगालमध्ये ११ नवीन रुग्ण आढळली आहेत. उत्तर प्रदेशात १५ नवीन रुग्ण आढळले आहेत. वाढत्या रुग्णसंख्येमुळे प्रशासनाने खबरदारीच्या सूचना दिल्या आहेत. तसेच गर्दीच्या ठिकाणी जाणं टाळा, मास्क लावा असा सल्ला देखील देण्यात आला आहे. मे महिन्यात कोरोना रुग्णांच्या संख्येत वाढ झाली आहे. मुंबईत दररोज सरासरी ९ जणांना कोरोनाची लागण होत आहे. मुंबईसह देशभरात कोरोना रुग्णांच्या वाढत्या संख्येबाबत इंडियन मेडिकल काऊन्सिल (खच-) ने कोरोनाला घाबरू नका, पण सतर्क राहा असं म्हटलं आहे. कोरोना व्हायरस पुन्हा परत येत आहे, परंतु त्याचा प्रभाव २०२० किंवा २०२१ सारखा नाही. कोरोना आता येत राहील, म्हणजेच दर काही महिन्यांनी त्याचं नवीन रुप दिसू शकतं असं आयएमए कोविड टास्क फोर्सचे सह-अध्यक्ष डॉ. राजीव विजयदेवन यांनी म्हटलं आहे.

## दिल्लीत एनआयए ने सीआरपीएफ जवानाला घेतले ताब्यात; पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याचा आरोप




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ नवी दिल्ली**

’ऑपरेशन सिंदूर’नंतर देशभरातून अनेक हेर पकडले जात आहेत. अलिकडेच ज्योती मल्होत्रा नावाच्या एका युट्यूबरलाही हेरगिरीच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. आता राष्ट्रीय तपास संस्थेने दिल्लीतून एका सीआरपीएफ जवानाला अटक केली आहे. तो देशाशी संबंधित संवेदनशील माहिती पाकिस्तानला पाठवत असल्याचा त्याच्यावर आरोप आहे. मीडिया रिपोर्ट्सनुसार, त्या जवानाला माहिती पाठवण्यासाठी पैसे मिळायचे.

मिळालेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्यांना संवेदनशील माहिती शेअर केल्याच्या आरोपाखाली एनआयएने दिल्लीतून सीआरपीएफ जवान मोती राम जाटला अटक केली आहे. तो २०२३ पासून भारताची गुप्त माहिती पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्यांना पुरवायचा. एनआयएच्या पथकाने त्याला पटियाला हाऊस कोर्टाच्या विशेष न्यायालयात हजर केले असता, कोर्टाने आरोपीला ६ जूनपर्यंत कोठडी सुनावली आहे. आरोपीच्या आणि त्याच्या कुटुंबातील सदस्यांच्या बँक खात्यांची तपासणी केली जात आहे.

**पैशासाठी देशद्रोह**

एनआयएला तपासात असे आढळून आले की, आरोपी गेल्या २ वर्षांपासून हेरगिरी करत होता. त्याला यासाठी पाकिस्तानकडून भरपूर पैसे मिळायचे. हे व्यवहार बहुतेक हवालाद्वारे केले जात होते. या संपूर्ण प्रकरणात आणखी लोकांचा सहभाग असू शकतो, असे पथकाने म्हटले आहे. त्यामुळे चौकशीनंतर आणखी अनेक गुपिते उघड होतील. मोतीराम जाटच्या संपर्कात असलेल्या किंवा ज्यांच्याद्वारे ही माहिती लीक होत होती अशा व्यक्तींवरही एजन्सी लक्ष ठेवून आहे. अटकेनंतर सीआरपीएफच्या नियमांनुसार जवानाला नोकरीवरून काढून टाकण्यात आले आहे. दरम्यान, ऑपरेशन सिंदूर नंतर भारतात अनेक हेर पकडले गेले आहेत. यामध्ये सर्वात लोकप्रिय नाव ज्योती मल्होत्रा आहे. युट्यूबर ज्योतीवर पाकिस्तानला गुप्तचर माहिती पाठवल्याचा आरोप आहे. भारतातील पाकिस्तान उच्चायुक्तालयाच्या माध्यमातून ती पाकिस्तानी गुप्तचर अधिकाऱ्यांच्या संपर्कात आली.

## मान्सून राज्यात; नागरिकांनी सतर्क-सुरक्षित राहून प्रशासनाच्या सूचनांचे पालन करावे : अजित पवार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६पुणे**

मान्सून मुंबईसह महाराष्ट्रात दाखल झाला असून हवामान खात्याने मुंबई, रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांना मुसळधार पावसाचा रेड अलर्ट जारी केला आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यासाठी उद्या रेड अलर्ट आहे. पालघरसाठी यलो अलर्ट आहे. मुंबई, ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, नाशिक, सातारा, सांगली, कोल्हापूर जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे. पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूरच्या घाट परिसरात पावसाचा जोर आणखी काही दिवस कायम राहणार आहे. या पार्श्वभूमीवर संबंधित जिल्हा यंत्रणांनी सतर्क राहून नागरिकांची सुरक्षितता, बचाव व मदतकार्याला सर्वोच्च प्राधान्य द्यावे. त्यासाठीच्या उपाययोजना तात्काळ राबवाव्यात. मुसळधार पावसाची शक्यता असलेल्या भागातील नागरिकांनी सावध रहावे. सुरक्षितस्थळी आसरा



घ्यावा. स्थानिक प्रशासनाच्या संपर्कात राहून त्यांच्या सूचनांचे पालन करून सहकार्य करावे, असे आवाहन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी मुसळधार पाऊस होत असलेल्या जिल्ह्यातील नागरिकांना केले आहे.

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुणे ग्रामीण भागातील गावांचा दौरा करत असतानाच, मंत्रालयातील राज्यस्तरीय आपत्ती नियंत्रण व व्यवस्थापन केंद्राकडूनही अन्य जिल्ह्यातील पाऊस, धरणांची स्थिती, स्थानिक परिस्थितीचा आढावा घेतला. मुसळधार पाऊस होत असलेल्या जिल्ह्यांच्या जिल्हाधिकाऱ्यांशी दूरध्वनीद्वारे चर्चा करुन परिस्थितीची, मदतकार्याची माहिती घेतली. शेतीचे, पिकांचे, पशुधनाचे, घरांच्या नुकसानीचे पंचनामे तात्काळ करण्याचे निर्देश त्यांनी दिले. राज्य आणि जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांनी सतर्क रहावे, परस्परांच्या संपर्कात राहून समन्वयाने, सहकार्याने बचाव, मदतकार्य तात्काळ राबवावे, असे निर्देशही उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहेत.

## अमित शहा आणि फडणवीसांचा एका गाडीतून प्रवास, तर नितीन गडकरी मात्र....

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६नागपूर**

केंद्रीय गृह आणि सहकार मंत्री अमित शाह नागपूरच्य दिड दिवसांच्या नागपूर दौऱ्यावर आले होते. शाह यांच्या उपस्थितीत सोमवारी नागपुरात महत्त्वाचे भूमिपूजन समारंभ आयोजित करण्यात आले होते. नॅशनल कॅन्सर हॉस्पिटल येथील ‘स्वस्ति निवास’ या निवासी इमारतीचे भूमिपूजन तसेच, चिचोली येथे नॅशनल फॉरेन्सिक सायन्स युनिव्हर्सिटीच्या कॅम्पसचे भूमिपूजनही त्यांच्या हस्ते करण्यात आले. या दोन्ही कार्यक्रमांना मुख्यमंत्री देवेंद्र



फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे उपस्थित होते. ऑपरेशन सिंदूरच्या यशानंतर अमित शहा नागपूरच्या कार्यक्रमात काय बोलणार याकडे सर्वांचे लक्ष होते. तसेच सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयानंतर तीन महिन्यांनी महापालिका आणि स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणार आहेत.

त्यामुळे शहांचे भाषण यादृष्टीने महत्त्वाचे मानले जात होते. मात्र, या दोन्ही कार्यक्रमांपैकी एकाच कार्यक्रमात त्यांनी भाषण केले. यात गडकरींविषयी ते काहीही बोलले नाही. तर मुख्यमंत्र्यांचे कौतूक केले. विशेष म्हणजे नागपूरमधील दोन्ही कार्यक्रमांना अमित शहा आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी एका गाडीतून प्रवास केला. तर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे त्यांच्या स्वतंत्र गाडीतून आले. त्यामुळे शहांचे निकटवर्ती कोण? अशी चर्चाही कार्यक्रम स्थळी रंगली होती.

रविवारी रात्री नऊ वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय विमानतळ, नागपूर येथे आगमन झाले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, महसूल मंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, गृह विभागाचे अप्पर मुख्य सचिव इक्बाल सिंह चहल, यांच्या सह भाजप शहरच्या वतीने अमित शाह यांचे जल्लोषात स्वागत करण्यात आले. परंतु या सोहळ्याला शहरातील संपूर्ण भाजपचे नेते उपस्थित असताना केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांची अनुपस्थिती चर्चेचा विषय ठरलेली आहे. विशेष म्हणजे अमित शहा यांचा रेडिसन ब्लू हॉटेलमध्ये मुक्काम होता. या हॉटेलच्या अगदी बाजूला गडकरी यांचे निवासस्थान आहे. असे असतानाही दोन्ही मोठ्या नेत्यांमध्ये कुठलीही भेट झाली नाही. हा दुरावा अनेक प्रश्न उपस्थित करून गेला आहे.

## मेळघाटात सध्या घरोघरी गुल्ली... पारंपरिक औषधी गुणयुक्त तेल काढण्यासाठी आदिवासी कुटुंबीयांची तयारी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

भरभरून देणाऱ्या निसर्गाच्या सानिध्यात सहवास असणाऱ्या मेळघाटात आदिवासी बांधवांच्या गावामध्ये सध्या घरोघरी गुल्ली दिसत आहे. लोणच्यासाठी कैरी फोडतात, तशा या गुल्ली फोडल्या जात आहेत. या गुल्लीतून औषधी गुणयुक्त तेल निघतं. आदिवासी समाजात अनेक पिढ्यांपासून गुल्ली तेल स्वयंपाकात वापरण्याची परंपरा आहे. एक दोन नव्हे तर अनेक व्याधींवर गुणकारी असणारं गुल्ली तेल आहे.

मेळघाटच्या जंगलात मोठ्या प्रमाणात मोहाची झाडं आहेत. या मोहाच्या झाडाला उन्हाळ्यात मोहर येतो. पहाटेच्यावेळी या झाडावरची फुलं खाली पडतात. ही फुलं वेचून ती सुकवली जातात. त्यानंतर या सुकलेल्या फुलांची सिड्डू अर्थात दारू काढली जाते. ही फुलं बरेच दिवस सुकवून ठेवली जातात. फुलांचा बहार गेला की मे महिन्यात मोहाच्या झाडाला फळं येतात. या



फळांना टणक असं आवरण असतं. मोहाच्या याच फळाला कोरकू भाषेत गुल्ली म्हणतात. आता पावसाळ्यात या गुल्लीतून तेल काढलं जातं.

मोहाच्या झाडाला लागलेलं फळं हे मजबूत असतं. मोहाच्या झाडावर मोठ्या संख्येनं वटवाघळं असतात. ही वटवाघळं झाडावरची ही फळं खाली पडतात. त्यानंतर आदिवासी बांधव झाडाखाली पडलेल्या बियांसारखे फळं वेचून घरी आणतात. कडक आवरण असणारी ही गुल्ली घरातील महिला फोडून काढतात. फोडल्यावर ही गुल्ली सुकवली जाते, अशी माहिती आमझरी येथील रहिवासी हिरा जांभेकर यांनी दिली.

हातपाय दुखत असले की गुल्लीचं तेल हाता-पायाला चोळलं की छान आराम मिळतो. गुडघे दुखत असतील, कंबर दुखत असेल तर या तेलानं मालिश केली की वेदना दूर होतात, असं आमझरी गावातील सिड्डू जांभेकर या वृद्ध महिलेनं सांगितलं. तसचं, गुल्लीचं तेल वापरून छान कांदा, लसूण तिकिट टाकून मोहाची भाजी आम्ही करतो. कोणत्याही भाजीत या तेलाचा वापर केला जातो, असं देखील सिड्डू जांभेकर म्हणाल्या.

**खादी ग्राम उद्योग मंडळाचं प्रोत्साहन**

मेळघाटातील हे गुणकारी तेल तयार करून सर्वदूर त्याचा लाभ व्हावा, यासाठी खादी व ग्राम उद्योग मंडळाच्यावतीनं चिखलदरा तालुक्यात अनेक महिला बचत गटांना गुल्ली जमा करून आणणे, त्या फोडणे आणि सुकवण्याचं काम देण्यात आलंय. यामुळं आदिवासी महिलांना रोजगार मिळतोय. चिखलदरा येथील स्फूर्ती क्लस्टरमध्ये लाकडी तेल घाणीत महिला बचत गटांनी आणून दिलेल्या गुल्लीचं तेल काढलं जातं. २०० ग्रॅम तेल २५० रुपये या दरानं विकलं जातं, असं स्फूर्ती क्लस्टरचे संचालक सुनील भालेराव यांनी सांगितलं.

## संपादकीय ......

# लग्न : एक इव्हेंट

पन्नास वर्षांपूर्वी ग्रामीण भागामध्ये लग्न लावण्याचा सोहळा अत्यंत साधा, सोपा असायचा. घरासमोरील अंगणात किंवा गावातील मोठ्या पटांगणात मातीचे बोहले उभे केले जायचे. या बोहल्यावर उभे राहून नवरा-नवरीचे लग्न लागत असे. नवरदेव डोक्याला बाशिंग लावून आणि नवरी पदर नाकापर्यंत घेऊन उभी असायची. काळ बदलला तसा यात मोकळेपणा येत गेला. अर्थात, या बदलत्या स्वरूपाचेही स्वागत केले गेले.

त्यानंतर लग्न कार्यालयात लागण्यास सुरुवात झाली आणि तिथून पुढे अतिशय श्रीमंत लोकांमुळे ती रिसॉर्टवर लागायला लागली. रिसॉर्टवर लग्न लावण्याचा मुख्य उद्देश केवळ प्रतिष्ठित लोकांनीच लग्नाला यावे असा असावा, असे वाटते. ज्याच्याकडे कार आहे तोच रिसॉर्टपर्यंत पोहोचू शकतो. मुलीकडचे दोन दिवस आधी येतात. मुलाकडचेही लग्नाच्या आधीच्या दिवशी तिथे पोहोचतात. कारंजी आजूबाजूला उडत असताना स्विमिंग पूलच्या आसपास लग्न लागते. लग्न हा एक संस्कार म्हटले, तर त्यातील संस्कार हा भाग संपून आता तो इव्हेंट झाला आहे, असे आपल्या लक्षात येईल. फोटोग्राफर, व्हिडीओग्राफर, मेंदी लावणार्या कलाकार, महिला मेकअप करणार्या महिला या सर्वांना मोठा व्यवसाय मिळत असतो.

लग्नाच्या आधीच्या दिवशी हळद लावली जाते. हा हळदीचा कार्यक्रम आता एक इव्हेंट झाला आहे. नवरदेव नवरी आणि एकंदरीतच हळदीला उपस्थित असणार्या सर्व महिला आणि पुरुष पिवळ्याधमक हळदीच्या रंगाचे पेहराव घालून आलेले असतात. सर्वत्र हळद पडल्यासारखे भासते.लग्न होण्यापूर्वी चार-पाच दिवस आधी मुलीकडच्या लोकांकडे मेंदीचा कार्यक्रम असाच सर्वसंमत झाला आहे. त्या दिवशी साऊंड सिस्टीम लावून नाचगाणे केले जाते. त्याच वेळेला एका कोपर्यात मेंदी लावणार्या महिला आर्टिस्ट आलेल्या असतात. लग्नामध्ये असाच आणखी एक महत्त्वाचा कार्यक्रम म्हणजे एन्ट्री. पूर्वी नवरा आणि नवरीचे मामा त्यांना घेऊन प्रमुख मंचावर येत असत. आता नवरा आणि नवरी दोघे मिळून एन्ट्री करतात. ती पण बर्याचदा सजवलेल्या रथामध्ये असते आणि त्याच्या भोवती असंख्य भुईनळे पेटवले जातात. आता लग्न हा सोहळा किंवा संस्कार राहिलेला नसून इव्हेंट झालेला आहे, असे आपल्या लक्षात येईल. बर्याचदा इव्हेंट मॅनेजर असतो. एकदा का इव्हेंट मॅनेजर नेमला की, बाकी सर्व प्रक्रिया तांत्रिक दृष्ट्या उपचार म्हणून पार पाडली जाते. असंख्य लोकांना वेगवेगळे व्यवसाय देणारा असा हा लग्नाचा इव्हेंट आजकाल सर्वत्र पाहायला मिळत आहे. आजकाल सर्व काही गोष्टींचा इव्हेंट झाला आहे. लोकांकडे पैसा खूप आल्याने सर्वत्रच इव्हेंट झाला आहे. अगदी बारावे घालावयाचे असल्यास हॉल बूक केला जातो आणि इव्हेंट केला जातो. अर्थात, यामागे खरे तर दिखावाच अधिक असतो, हे प्रकर्षाने दिसून येते.

# मान्सून अखेर महाराष्ट्रात दाखल:१२ दिवस आधीच आगमन, हवामान विभागाची अधिकृत घोषणा


## यंदा सरासरीपेक्षा जास्त असणार पाऊस राज्यात पुढील तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६ अमरावती-** राज्यातील नागरिकांनी अनेक दिवसांपासून ज्या मान्सूनची वाट पाहत होते, तो आज रविवार, २५ मे रोजी महाराष्ट्रात दाखल झाला. हवामान खात्याने याबाबत अधिकृत घोषणा केली असून, यावर्षी मान्सून अपेक्षेपेक्षा तब्बल १२ दिवस आधी राज्यात पोहोचला आहे. मान्सून वेळेपूर्वीच दाखल झाल्याने शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला असून, आनंदाचे वातावरण आहे.

दरवर्षी साधारणतः ७ जूनच्या सुमारास महाराष्ट्रात मान्सून दाखल होत असतो. शनिवारी केरळात पोहोचलेल्या मान्सूनला, महाराष्ट्रात आगमनासाठी एक ते दोन दिवस लागतील, असा अंदाज वर्तवण्यात आला होता. मात्र मात्र यंदा हवामानातील पोषक स्थितीमुळे अवघ्या काही तासांतच मान्सून रविवारी महाराष्ट्रात दाखल झाला.

आज २५ मे २०२५ रोजी नैऋत्य मान्सून पश्चिममध्य आणि पूर्वमध्य अरबी समुद्राच्या काही भागात, कर्नाटकच्या काही भागात, संपूर्ण गोवा, महाराष्ट्राच्या काही भागात, पश्चिममध्य आणि उत्तर बंगालच्या उपसागराच्या काही भागात आणि मिझोरामच्या काही भागात, मणिपूर आणि नागालँडच्या काही भागात पुढे सरकला आहे.

मान्सूनची उत्तर सीमा १५.५ओछ/५५ओए, १५.५ओछ/६०ओए, १६ओछ/६५ओए, १६.५ओछ/७०ओए, देवगड, बेलागावी, हावेरी, मंड्या, धर्मपुरी, चेन्नई, १५ओछ/८३ओए, १८ओछ/८७ओए, २०ओछ/८९ओए, ऐझवाल, कोहिमा, २६.५ओछ/९५ओए, २७ओछ/९७ओए.पुढील ३ दिवसांत नैऋत्य मान्सून मध्य अरबी समुद्राच्या काही भागात, मुंबईसह महाराष्ट्राच्या काही भागात, कर्नाटकसह बंगळुरू, आंध्र प्रदेशचा काही भाग, तामिळनाडूचा उर्वरित भाग,




पश्चिममध्य आणि उत्तर बंगालच्या उपसागराच्या काही भागात आणि ईशान्येकडील राज्यांच्या काही भागात पुढे जाण्यासाठी परिस्थिती अनुकूल आहे, अशी माहिती हवामान विभागाच्या वतीने देण्यात आली आहे.

**यंदा सरासरीपेक्षा जास्त पावसाचा अंदाज**

यंदाच्या वर्षी राज्यात आणि देशभरात पावसाचे प्रमाण सरासरीपेक्षा जास्त असण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे. हवामान तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, यंदा देशात मान्सून १०७ टक्क्यांपर्यंत पाऊस पडू शकतो. त्यामुळे शेतकऱ्यांसह सर्वसामान्य नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. राज्यातही समाधानकारक आणि भरघोस पावसाची शक्यता असल्याने कृषी क्षेत्राला मोठा दिलासा मिळू शकतो.

**१ जून ते ३० सप्टेंबरदरम्यानचा पाऊस मान्सून**

मान्सून लवकर किंवा उशिराचा पावसावर परिणाम होत नाही. फक्त १ जून ते ३० सप्टेंबरदरम्यानचा पाऊस मान्सूनचा म्हणून नोंदवला जातो. गेल्या ५० वर्षांत, मान्सून नियोजित तारखेला म्हणजे १ जून रोजी फक्त तीनदा दाखल झाला. २५ वेळा तो १ ते १२ दिवस आधी आला आहे. २२ वेळा तो उशिरा आला आहे. २००९ मध्ये, जेव्हा मान्सून २३ मे रोजी आला तेव्हा फक्त ७८% पाऊस पडला. २००९ मध्ये मान्सून १३ जून रोजी आला होता, पण त्या वर्षी १०२% पाऊस पडला होता.

**राज्यात पुढील तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा**

दरम्यान, अरबी समुद्रात सध्या कमी दाबाचा पट्टा निर्माण झाल्यामुळे राज्यातील अनेक भागांमध्ये पुढील दोन ते तीन दिवस मुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. विशेषतः कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्हे तसेच कोल्हापूर व सातारा जिल्ह्यांच्या काही भागांमध्ये मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. याशिवाय पुणे, मुंबई, ठाणे, पालघर, नांदेड, लातूर आणि चंद्रपूर या जिल्ह्यांमध्येही पावसाचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

# रोग व कीडमुक्त उत्पादनासाठी कशी कराल आले पिकाची लागवड; वाचा सविस्तर

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

महाराष्ट्रात आले पैसे मिळवून देणारे पीक म्हणून शेतकरी त्याकडे आकर्षित होऊ लागले आहेत. महाराष्ट्र प्रामुख्याने सातारा, सांगली, रायगड, ठाणे, औरंगाबाद, लातूर, नांदेड या जिल्ह्यामध्ये आल्याची लागवड मोठ्या प्रमाणावर केली जाते.




**सुधारित जाती-** महाराष्ट्राच्या माहीम या स्थानिक नावाने ओळखल्या जाणाऱ्या वाणाची लागवड केली जाते. याशिवाय रेयो दि-जेनेरा जमैका, जपानी, कोचीन, सुरुची, सुरभी, सुप्रभात, वायनाड, मारन या सुधारित जाती लागवडीसाठी व अधिक उत्पादनासाठी फायदेशीर आहेत.

**बेणे कसे निवडाल?**

- शेतात मूळकुजव्या रोग असेल, अशा शेतातील कंद लागवडीसाठी वापरू नयेत.

- आल्याची लागवड फुगलेल्या डोळ्यांच्या बोटापासून करतात.

- अंदाजे २५ ते ३० ग्रॅम वजनाचे बोट (तुकडे/कुडी) रोगविरहित साठवणीतून काढलेले लागवडीसाठी वापरतात.

- त्यावर १ ते २ रसरशीत डोळे असावेत.

- हेक्टरी १५०० ते १८०० किलो बेणे लागते.

**पूर्वतयारी**

- जमीन नांगराने १५ ते २० सेंटीमीटर खोल नांगरून ढेकळे फोडून भुसभुशीत करावी.

- जमीन तयार करत असताना, त्यामध्ये शेणखत किंवा कंपोस्ट खत २५ ते ३० टन प्रति हेक्टरी द्यावे.

**कशी कराल लागवड?**

- आल्याची लागवड सपाट वाफ्यावर, रुंद, वरंबा पद्धत किंवा सरी पद्धतीने करतात.

- मे महिन्यात लागवड केल्यास उत्पादनात वाढ होते.

- जमीन हलकी असल्यास ३ बाय २ मीटरचे सपाट वाफे करावेत.

- मध्यम व भारी जमिनीत सरी वरंबे तयार करावेत.

- हे करताना दोन वरंब्यातील अंतर ६० सेंटीमीटर ठेवावे. २० सेंटीमीटर उंचीचे व तीन मीटर लांबीचे व एक मीटर रुंदीचे गादी वाफे करावेत.

**खत व्यवस्थापन**

- अधिक उत्पादनासाठी हेक्टरी २५ ते ३० टन कुजलेले शेणखत लागवडीपूर्वी द्यावे.

- आल्याच्या पिकाला हेक्टरी ७५ किलो नत्र, ५० किलो स्फुरद आणि २५ किलो पालाश प्रती हेक्टरी रासायनिक खताच्या स्वरूपात द्यावे.

- आल्याची लागवड करताना नत्राचा निम्मा हप्ता म्हणजेच ३७.५ किलो, ५० किलो स्फूरद व २५ किलो पालाश जमिनीत मिसळावे.

- लागवडीनंतर ४० दिवसांनी निम्मे नत्रे म्हणजेच ३७.५ किलो प्रती हेक्टर द्यावे.

- या नत्राच्या हप्त्यानंतर ३० दिवसांनी तणांचा बंदोबस्त करणे आवश्यक आहे.

- त्यासाठी पावसाळा संपल्यानंतर सहा ते आठ दिवसांनी पाणी दिले पाहिजे.




शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बॅंकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

**पिक संरक्षण**

- आल्यावर कंदमाशीचा प्रादुर्भाव प्रामुख्याने होत असतो.

- कंदमाशी नियंत्रणासाठी लागवडीपूर्वी बीजप्रक्रिया करावी. त्यासाठी निरोगी कंदाची निवड करावी.

- लागवडीपूर्वी शेतात प्रती हेक्टर १६ किलो ०.३ टक्के फीप्रोनिल ही कीटकनाशके देण्यात यावीत.

- हळदीप्रमाणे आल्याच्या शेतातही सुक्या मासळीचा ट्रॅप लावावा.

- आल्यावरील मूळकूजव्या रोगाचा प्रादुर्भाव जमिनीत पाणी साचल्याने होतो.

- रोगग्रस्त आले रोग दिसून येताच नष्ट करावे.

- कंद मेटॅलिक्झिल ०.३ टक्के, मॅन्कोझेब या संयुक्त बुरशीनाशकाच्या द्रावणात पाच मिनिटे बुडविल्यास रोग आटोक्यात येतो.

**काढणी व उत्पादन**

- लागवड ते काढणीपर्यंत योग्य उपाययोजना केल्यास उत्पादन चांगले येते.

- ओल्या आल्यासाठी लागवडीनंतर ६ ते ८ महिन्यांनी पाने पिवळी पडल्यावर किंवा वाळल्यानंतर पीक काढणीसाठी योग्य होते.

- मात्र, सुंठ तयार करण्यासाठी पाला वाळून खाली पडल्यावर म्हणजे २१० ते २२० दिवसांनी कुदळीने काढणी करावी.

- सुधारीत पद्धतीने लागवड केल्यास हेक्टरी १० ते १५ टन उत्पादन मिळते.

- सुंठासाठी आल्याचे कंद पाण्यात भिजवून स्वच्छ करावे व साल काढून उन्हात ७ ते ८ दिवस वाळवावे.




# पोट फुगल्यासारखे वाटते? हे उपाय करून पाहा

**दि.२६विदर्भ प्रजासत्ताक**

आपले पोट जरा देखील फुगले की, आपलं कोणत्याच कामात लक्ष लागत नाही. कधी कधी पोटात हवा असल्यासारखं वाटतं. तर कधी पोट गच्च वाटतं. काही तरी खाल्ल्यानंतरदेखील (डींरलह इश्रेरीं-ळपस) आपले पोट फुगते. कधी कधी आपण सकाळी नाश्ता केल्यानंतर थेट आपण दुपारीच जेवतो. पण, दुपारी जेवल्यानंतर काही वेळाने आपले पोट खूपचं फुगल्यासारखे वाटते. काही जणांना पोटात दुखूही लागते. सकाळी नाश्ता केल्यापासून दुपारपर्यंतचा जो कालावधी आहे, त्या वेळेत काही किरकोळ खावे, शेंगदाणे, फुटाणे, फळे असेही पदार्थ तुम्ही खाऊ शकता. खूप वेळ पोट रिकामं ठेवू नये, असे म्हटले जाते.

खूप वेळ उपाशी राहू नये, असे म्हटले जाते. कधी कधी आपल्याकडून एकाचवेळी खूप सारे पदार्थ खाल्ले जातात. पण, तसे न करता थोड्या-थोड्या अंतराने खावे. खूप वेळ उपाशी राहू नये. नाही तर गॅसची समस्या जाणवू लागते. सिडीटी होऊनही जळजळ, मळमळ आणि अस्वस्थपणा जाणवतो. आपण पाणी न पिल्यामुळेही किंवा जड पदार्थ खाल्ल्यानंतर ते न पचल्यामुळेही ही समस्या उद्भवते. यावर काही घरगुती उपाय करून या समस्येतून तुम्ही मुक्त होऊ शकता.

**ओव्याचे पाणी-** चिमुटभर ओव्यानेही पोट साफ व्हायला मदत होते. पोट जड झाल्यासारखं वाटल्यास पटकन चिमुटभर ओवा चावून खावा आणि त्यावर गरम पाणी प्यावे. पचनसंस्थेसाठीही ओवा खूप गुणकारी आहे. ओव्याचे पाणीही तुम्ही पिऊ शकता. यासाठी रात्री एक ग्लास गरम पाण्यामध्ये अर्धा चमचा ओवा भिजत घालावा. सकाळी उठून हे पाणी गाळून रिकाम्या पोटी प्यावे. दिवसभर तुम्हाला पोट फुगणार नाही, पोट साफ तर होईलचं शिवाय पोटात सूजही येत नाही.

**खाण्याचा सोडा-लिंबू-** अन्नपचन झाले नाही की, तरीही पोट फुगते. अशा वेळी अर्धा लिंबू कापून



घ्यावा. त्यावर चिमुटभर खाण्याचा सोडा टाकावा. सोडा टाकल्यानंतर लिंबूपटकन तोंडात टाकावा. त्याचा रस प्यावा. दुसरे म्हणजे एका वाटीत अर्धा लिंबू पिळावा. त्यामध्ये चिमुटभर टाकावा आणि हे पाणी पटकन प्यावे. यामुळे पचनक्रिया सुलभ होण्यास मदत होईल.

**पुदिना-** घरी पुदिना असेल तर त्या पानांपासून मस्त पुदिना सरबत बनवा. पुदिनामुळे पोट थंड राहत. छातीत होणारी जळजळही कमी होते. मसालेदार, तेलकट पदार्थांच्या पचनासाठी पुदिना खूप फायदेशीर आहे. पुदिनाची चार-पाच पाने चावून खाल्ली तरी आराम मिळतो.

**बडीशेप-** बडीशेप आरोग्यासाठी खूपचं फायदेशीर आहे. वजन कमी करण्यासाठी बडिशेपच्या पाण्याचा वापर केला जातो. अनेकजणांना जेवल्यानंतर बडीशेप खाण्याची सवय असते. जेवणानंतर पचनक्रियासाठी बडीशेप खूपच फायदेशीर आहे.

**पेरू-** सकाळी रिकाम्या पोटी पेरू खाण्याचा सल्ला डॉक्टर देतात. पेरूमुळे पोट साफ होते.

# अमरावती विद्यापीठ कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठातील सर्व कर्मचाऱ्यांशी साधला संवाद

## विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच संवाद सभा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६ अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची धुरा ज्यांच्या यशस्वी नेतृत्वाखाली गतिमान आहे आणि त्यांनी अल्प कर्मचारी संख्या असूनही कर्मचाऱ्यांमध्ये संस्थेविषयी आपुलकी निर्माण करून विद्यापीठाची प्रशासकीय यंत्रणा इतर विद्यापीठांच्या तुलनेत अधिक गतिशील करून दाखविली मिलींद असे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी नुकताच विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभागृहात विद्यापीठ कर्मचाऱ्यांशी एका विशेष संवाद साधला. याप्रसंगी व्यासपीठावर प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे उपस्थित होते. विद्यापीठाच्या इतिहासात पहिल्यांदाच अशी कुलगुरू आणि कर्मचायांमध्ये संवाद सभा संपन्न झाली.संवाद सभेचा मुख्य उद्देश कुलगुरू आणि कर्मचारी यांच्यातील संवाद वाढवणे, कर्मचाऱ्यांच्या अडीअडचणी समजून घेणे आणि विद्यापीठाच्या प्रगतीसाठी एकत्रितपणे काम करण्याच्या संधींवर चर्चा करणे होता. याप्रसंगी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी नवीन शैक्षणिक धोरण विद्यापीठाने लागू केले आहे, त्यामुळे ते समजून घेऊन त्याची परिपूर्ण अंमलबजावणी करण्यासाठी सर्वांनी परिश्रम घेण्याची गरज आहे. याप्रसंगी



त्यांनी विद्यापीठाची सद्यस्थिती व आगामी योजनांबद्दल तसेच शैक्षणिक आणि प्रशासकीय उदिष्टांबद्दल विस्तृत माहिती दिली.

विद्यापीठाला ४२ वर्ष पूर्ण झाली आहेत. या विद्यापीठाचे वटवृक्षात रूपांतर करण्यासाठी येथील कर्मचाऱ्यांनी आजवर अथक परिश्रम घेऊन विद्यापीठाचा नावलौकिक जागतिक स्तरावर पोहोचविण्यासाठी बहुमूल्य योगदान दिले आहे, याबद्दल कुलगुरूंनी सर्वांचे कौतुक करून सर्व कर्मचाऱ्यांनी विद्यापीठाच्या विकासात आणखी सक्रिय सहभाग घ्यावा, असे आवाहन केले.कर्मचाऱ्यांनीही आपली मते, सूचना आणि काही समस्या कुलगुरूंसमोर मांडल्या. कुलगुरूंनी कर्मचाऱ्यांच्या प्रत्येक मुद्दे गांभीर्याने ऐकून घेतले आणि त्यावर योग्य विचार करून सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांना त्यांनी थेट उत्तरे दिलीत आणि त्यांच्या शंकांचे निरसन केले.या संवाद सभेमुळे कुलगुरू आणि कर्मचारी यांच्यातील संबंध अधिक दृढ होण्यास मदत झाली. दोन्ही बाजूंनी एकमेकांच्या भूमिका समजून घेण्यास आणि भविष्यात अधिक चांगल्या प्रकारे समन्वय साधण्यास या संवाद सभेमुळे व्यासपीठ मिळाल्याची भावना कर्मचायांनी मांडून आनंद व्यक्त केला. संवाद सभेचे संचालन रमेश जाधव यांनी केले. यावेळी सर्व कर्मचारी सभेला उपस्थित होते.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाधा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

सोमवार दि. २६ मे २०२५ शहर/ग्रामिण


## चिखलदऱ्यात क्रेटा कार ...

# ५०० फुट दरीत कोसळतांना थोडक्यात बचावली

### सुदैवाने कारमधील चार युवकांचे प्राण वाचले

### पोलिस व वन विभागाने कारला काढले बाहेर








**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६चिखलदरा –** रविवारी पावसात चिखलदरा येथे निसर्गरम्य वातावरणाचा आनंद घेण्यासाठी एमएच–२९–बीएस–७००९ क्रमांकाच्या क्रेटा कारमधील चौघांना आज २५ मे रोजी जवळून मरण दिसले. चिखलदरा येथील किला पाईन्ट रस्त्यावर कार ५०० फुट खोल दरीत कोसळताना अगदी थोडक्यातबचावली. पोलिस व वन विभागाने तात्काळघटनास्थळी धाव घेऊन कारला बाहेर काढले. काही प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, अचानक पडलेल्या पावसामुळे किल्ला मार्गावर असलेल्या एका सेल्फी पॉईंटवर या चार मित्रांनी आपली कार उभी केली होती. मात्र पावसामुळेजमिनीत ओलावा आणि गवत असल्याने कार अनियंत्रित होऊन खाईकडे सरकू लागली. पाहता पाहता कार गवत व चिखलामुळे घसरली आणि तिचा एक भाग हवेत लटकत राहिला. मोठा अपघात होण्यापासून तो प्रसंग थोडक्यातटळला.घटनास्थळी उपस्थित स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदत करत कारमधील सर्वचार तरुणांना सुरक्षित बाहेर काढले. सुदैवाने कोणालाही इजा झाली नाही. या घटनेमुळे पुन्हा एकदा पावसाळ्यात किल्ला रस्त्यावरील धोकादायक वळणांवर सुरक्षा यंत्रणेचा अभाव स्पष्ट झाला आहे. स्थानिक नागरिकांनी प्रशासनाकडे मागणी केली आहे की, या मार्गावर चेतावणी फलक, माहितीफलक ,गार्ड, रेलिंग बसवण्यात यावेत.

तसेच पोलिस आणि वन विभाग यांनी संयुक्त गस्त वाढवावी आणि पर्यटकांना सावधगिरीबाबत मार्गदर्शन करण्यासाठी नियोजन करावे. स्थानिकांचे म्हणणे आहे की, हे ठिकाण तरुणांसाठी एक लोकप्रिय पर्यटनस्थळ बनले आहे, परंतु पावसाळ्यात हे ठिकाण जीवघेणे ठरू शकते. त्यामुळे प्रशासनाने तातडीने उपाययोजना करून हा मार्ग सुरक्षित करावा, जेणेकरूनभविष्यात मोठ्या दुर्घटनेपासून बचाव होऊ शकेल.

## अमरावती जिल्ह्यातील चार महिन्यातील दुष्टचक्र

# ६१ शेतकऱ्यांनी मृत्युला कवटाळले



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती –** अमरावती आत्महत्यांचे सत्र जिल्ह्यात शेतकरी आत सुरूच असून मागील चार महिन्यात शेतकऱ्यांनी जीवनयात्रा संपविली. गत वर्षात काही ठिकाणी पडलेला पावसाचा खंड. काही भागात झालेली अतिवृष्टी यामुळे पिकांचे उत्पादन कमी झाले. त्याचे परिणाम जाणवू लागले आहेत. गत महिन्यात १९ शेतकरयांनी आत्महत्या केल्याचे वास्तव समोर आले आहे.शासनाच्या उदासीन धोरणाचा फटका असल्याचे शेतकरी बांधव तसेच संघटनांनी आरोप केला आहे. कर्ज काढून पेरणी करणे, पीक वाचविण्यासाठी अथक मेहनतकरूनही कधी नैसर्गिक आपत्तीमुळे नुकसान, तर कधी मालाला भाव नाही यामुळे शेतकरी कमालीचे अडचणीत आले. या चक्रात सापडलेल्या शेतकऱ्यांना कर्जाची परतफेड कशी करावी, याचा सामना नेहमीच करावा लागतो. या व इतर कारणांमुळे अनेक शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्याचे समोर येत आहे.जानेवारी ते डिसेंबर २०२४ या काळात २०० शेतकऱ्यांनी आत्महत्या केल्या होत्या; तर यंदा सुरुवातीच्या चार महिन्यातच ६१ शेतकऱ्यांनी विविध कारणांनी आत्महत्या केल्या आहेत. यापैकी मागील महिन्यात १९ शेतकऱ्यांनी आत्महत्येचा मार्ग निवडला. नैसर्गिक आपत्ती, नापिकी, दुष्काळ, बँकांचे आणि सावकाराचे कर्ज, कर्ज वसुलीचा तगादा, मुलीचे लग्न, आजारपण यासह विविध कारणांमुळे शेतकऱ्यांचा धीर खचूनशेतकरी आत्महत्या होत आहेत. सततचा पाऊस, अतिवृष्टीने झालेले पिकांचे नुकसान त्यामुळे उताऱ्यात घट आल्याने उत्पादन खर्च पदरी पडत नसल्याने शेतकऱ्यांच्या संघर्षावर नैराश्य मात करत आहे. तर दुसरीकडे शासनाच्या उदासीन धोरणाचे कारणही शेतकरी आत्महत्या कारणीभूत आहे.जिल्हात चार महिन्यात ६१ शेतकरी आत्महत्या झाल्या असून त्यात निकर्षानुसार ९ आत्महत्या पात्र ठरविण्यात आल्या, तर ४८ आत्महत्या अद्यापही चौकशीसाठी प्रलंबित आहेत. ९ पात्र आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबापैकी ४ कुटुंबांना अर्थसहाय्य देण्यात आल्याची माहीती आहे तर ५ पात्र कुटुंब अद्यापही शासकिय मदतीपासून वंचित आहेत.

**शेतकरी आत्महत्यांचे प्रमाण**

| | | |
|---|---|---|
| जानेवारी | २०२५ | १३ |
| फेब्रुवारी | २०२५ | ११ |
| मार्च | २०२५ | १८ |
| एप्रिल | २०२५ | १९ |
| एकूण | | ६१ |

## 'महाबीज' बीटी कापूस बिया बनवणे वाणाचे लोकार्पण



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अकोला,–** राज्य बियाणे महाकामी पैलपाडा येथील संशोधन केंद्र, तसेच सेंटर ऑफ एक्सलन्स येथे उल्लेखित संकरित बीटी कपाशी वाण महाबीज १२४ वाण सहविपणन अंतर्गत संकरित बीटी कपाशी 'महाबीटी बीजी दोन' या वाणाचे लोकार्पण करण्यात आले.

हे वाण हे उच्च उत्पादनाचे असून कोरडवाहू क्षेत्रासाठी वरदान ठरणार आहे, असा विश्वास महाबीजचे व्यवस्थापकीय संचालक योगेश कुंभेजकर यांनी व्यक्त केला आहे.

महाबीज सुधारित तू बियाण्याचेही लोकार्पण करण्यात आले. तुरीचे एमपी व्हीव्ही १०६ या जातीचे बियाणे दक्षिण भारत प्रसारित करण्यात आले आहे. या वाणाची उत्पादन क्षमता देखील उत्कृष्ट आहे. बियाची दक्षिण भारत तुळतुळ तामिळडू व कर्नाटक या राज्यातून प्राप्त मुक्त आहे. बियाणे पुरवठ्याची संपूर्ण तयारी लवकर आणि बियाच या राज्यांना लाभ होणार आहे. या काँग्रेसचे 'महाबीज'चे संशोधन व विकास कार्यकर्ता सहभागी सर्व अधिकारी कर्मचारी डॉ. रणजीत सपकाळ यांनी अभिनंदन केले. महाप्रबंधक विजय यांनी महाराष्ट्रातील प्रत्येक बळकटीकरणाची गरज लक्षात ठेवा त्या भारतीय जनता संशोधक व विकासाचे बद्ध महासंशोधन व विकास त्याचं बियाणे मोठे आहे, असे स्पष्टपणे सांगितले. इतर पिकातही आपण बियाण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

काँग्रेस प्रतिनिधी प्रतिनिधींना संकरित बीटी कपाशी वाणाचे वितरण करण्यात आले. सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. सूत्रसंचालन महाबीजचे उपमहाव्यवस्थापक श्री गणेश जी डहाळे यांनी तर कार्यक्रमाचे आभार डॉ. प्रफुल्ल लहाने यांनी महिला.

# पाऊस पडला तरी पेरणीची घाई नको

### सरकारचे शेतकऱ्यांना आवाहन; मान्सूनची गती मंदावणार?



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.२६अमरावती–** यंदाच्या वर्षी मान्सूनचा प्रवास वेगाने सुरू झाल्याने २५ मे रोजीच दक्षिण कोकणात तो दाखल झाला आहे. तब्बल दहा दिवस आधी पावसाने राज्यात वर्दी दिली आहे. दरम्यान पुढच्या दोन दिवसात मान्सूनच्या प्रवासाची गती कमी होणार असून राज्यातील हवामानात लबवकरच मोठे बदल दिसून येणार आहेत. शेतकऱ्यांनी पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात रविवारी करण्यात आले आहे. शेतकऱ्यांनी पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

ज्यातील अनेक भागात मान्सून पूर्वीचा वादळी पाऊस पडला आहे. आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल, अशी अपेक्षा करून अथवा खोट्या बातम्यांवर विश्वास ठेवून शेतकऱ्यांनी विशेषतः कोरडवाहू शेतकऱ्यांनी पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे. राज्यातील हवामानात लवकरच मोठे बदल दिसून येतील.सध्याच्या अंदाजानुसार २७ मे पासून राज्यातील हवामान हळूहळू होईल आणि काही प्रमाणात तापमानात वाढ देखील होईल. मे महिन्याच्या शेवटपर्यंत कोकण वगळता बहुतांश भागात प्रामुख्याने कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे, आणि किमान ५ जूनपर्यंत ही स्थिती कायम राहणार असल्याचा अंदाज आहे.या दरम्यान देशातील इतर भागात सुद्धा मान्सूनचा प्रवास तात्पुरता थांबू शकतो. त्यामुळे आपल्या भागात मान्सून लवकरच दाखल होईल अशी अपेक्षा करून शेतकऱ्यांनी पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.

# धामणगाव गढी येथे कार थांबवून तपासणी

## कारमधून १.८१ लाखाचा एचटीबीटी बियाण्यांचा साठा जप्त

### कृषी विभागाच्या भरारी पथकाची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताकदि.२६परतवाडा**

धामणगाव गढी येथील मंगलमूर्ती कृषी सेवा केंद्रावर छापा टाकून कृषी विभागाच्या पथकाने एचटीबीटी कपाशीच्या बियाण्यांची बेकायदेशीर विक्री उघडकीस आणली आहे. या छाप्यात १ लाख ८१ हजार ९०० रुपयांच्या किमतीचे १११ बेकायदेशीर बियाण्यांचे पॅकेट्स जप्त करण्यात आले आहेत. पथकाने कृषी केंद्रालगत असलेल्या गोदामाची तपासणी केली. संशयाच्या आधारावर कृषी केंद्राच्या मालकाच्या चारचाकी वाहनाची झडती घेण्यात आली, ज्यामध्ये एचटीबीटी कपाशीचे बियाणेआढळून आले. या प्रकरणी परतवाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.कृषी विभागाला माहिती मिळाली होती की, धामणगाव गढीतील मंगलमूर्ती कृषी सेवा केंद्रामध्ये बेकायदेशीररित्या एचटीबीटी कपाशी बियाण्यांची विक्री होत आहे, यावर तत्काळ कारवाई करत उपविभागीय कृषी अधिकारी प्रफुल्ल सातव यांच्या नेतृत्वाखाली एक पथक तयार करण्यात आले. या पथकात गुणवत्ता नियंत्रण निरीक्षक संजय पाटील, मोहिमअधिकारी (जि.प. अमरावती) प्रवीणखर्चे, अक्षय क्षीरसागर, रवीकांत उईके, शरद वरणकर, राकेश भुसुम व वाहनचालक प्रदीप वानखडे यांचा समावेश होता. बियाणे जप्तकरून परतवाडा पोलीस ठाण्यात गुजरातमधील ग्लायफो फार्म गांधी नगर व धामणगाव गढीचे रहिवासी राहुल विजय अग्रवाल यांच्याविरुद्ध बीज अधिनियम १९६६, बीज नियंत्रण आदेश १९८३, पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६, कपाशी बीज अधिनियम २००९, माप व वजन अधिनियम, कपाशी मूल्य नियंत्रण अधिनियम २०१५ व आवश्यक वस्तू अधिनियम १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईची माहिती महिला पोलीस नाईक प्रज्ञा राऊत यांनी दिली. ही कारवाई विभागीय कृषी सहसंचालक प्रमोद लहाळे व जिल्हा कृषी अधीक्षक राहुल सातपुते यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

## संत बेंडोजी बाबा पालखीची १३६ वर्षांची परंपरा

## घुईखेड ते पंढरपुर पायदळ वारीचे प्रस्थान

### ९ जुलै ला पंढरपुरला पोहोचणार



**विदर्भ प्रजासत्ताकदि २६घुईखेड (चांदुर रेल्वे)–** आषाढी एकादशी पायदळ वारीचे आयोजन चांदूर रेल्वे तालुक्यातील घुईखेड येथील श्री. बेंडोजी बाबा संस्थानतर्फे करण्यात आले असुन ही वारी चालत, वाजत, गाजत, भजन, कीर्तन, भारूड करत ऊन अंगावर फुले झेलल्यासारखी झेलत पंढरीसाठी शेकडो भाविकांसह शुक्रवारी (ता. २४) रवाना झाली. ही दिंडी ९ जुलै ला पंढरपुर येथे पोहोचणार आहे.या वर्षीच्या वारीचं वैशिष्ट्य ठरले ते ५२ भाविकांची पायदळ दिडी, ज्यात महिला भगिनींचा लक्षणीय सहभाग होता. दिडीचं पूजन प्रशांत घुईखेडकर सहपत्नी यांनी श्रद्धेने केले. यानंतर प्रवीण घुईखेडकर (विश्वस्त) यांच्या हस्ते पवित्र पादुकांचे पूजन व आरती करण्यात आली. त्यानंतर नित्य– नियमानुसार गावातील चंद्रभागा नदीकडे दिडी प्रस्थान करीता मार्गस्त झाले. लाखो भाविकांचे श्रध्दास्थान असलेले श्री. संत बेंडोजी महाराज (संजीवनी समाधी) यांच्या ४७ दिवसाच्या पायी दिडीमध्ये घुईखेडसह आजुबाजुच्या गावांतील भाविक घरदार, कोणाच्याही पत्राची, आमंत्रणाची वाट न पाहता सर्व कामे बाजूला ठेवून किवा पूर्ण करून वारीला निघण्यास तयार झाले होते. भाविक घुईखेड येथुन प्रस्थानापासून ते पंढरीपर्यंत चालत सतत त्या माउलीचे नाव घेत भजन, कीर्तन करत वारीत सामील झाले. अगदी मोकळ हवेतून चालत, घाटातून चालत, मोकळ रानातून, दाट झाडीतून, मजल दरमजल करतभाविक निघाले. श्री. संत ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळ्यातील श्री. ज्ञानेश्वर माऊली रथामागील एकुण २१ मानाच्या दिड्यापैकी मानाची दिंडी म्हणुन श्री. संत बेंडोजी महाराज संस्थान, घुईखेडच्या दिडीचा १७ वा क्रमांक आहे. व या रथामागे विदर्भप्रांतातुन जाणारी घुईखेड येथील एकमेव दिंडी आहे. पायी दिडी सोहळ्याची वारकरी संप्रदायाची परंपरा ही एकुन १३६ वर्षांपासुन चालत आलेली आहे. १० जुलै रोजी विनेकरांचे पंढरपूर काल्यानंतर दिडी परतीच्या प्रवासात आळंदीकडे रवाना होणार आहे.

# पंढरीत येणाऱ्या भाविकांना १ दिवसापूर्वी करता येणार बुकिंग

### श्री विठ्ठल दर्शनासाठी ३६०० भाविकांना करता येणार दररोज ऑनलाइन बुकिंग



**विदर्भ प्रजासत्ताक, दि.२६पंढरपूर**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून दर्शन पास नोंदणीची सुविधा भाविक भक्तांसाठी उपलब्ध असून जास्तीत जास्त भाविकांना श्री विठ्ठल रुक्मिणीचे पददर्शन घेता यावे यासाठी मंदिर समितीने दर्शन पास ऑनलाइन बुकिंग संख्येत व वेळेत वाढ केली आहे. त्यामुळे दररोज ३ हजार ६०० भाविकांना बुकिंग करून आपला दर्शन पास मिळवता येणार आहे. आगामी आषाढी एकदशीमुळे वारकरी आणिसमितीच्या अधिकृत संकेतस्थळावरून अगोदरच आपली दर्शन वेळ निश्चित करून दर्शन पास नोंदणीची सुविधा गेल्या दहा वर्षांपासून उपलब्ध आहे. आजवर प्रत्येक तासाला ५०० भाविकांसाठी नोंदणी करण्याची सुविधा होती. या सुविधेचा वापर करून, भक्तांना त्यांच्या सोयीनुसार दिवस आणि वेळ निश्चित करून पदस्पर्श दर्शन घेता येते. यामुळे दर्शनरांगेत जास्त वेळ उभे राहण्याची आवश्यकता नसते. महत्त्वाचे सण, यात्रा, उत्सव व गर्दीचे दिवस वगळून स.७ ते रा.९ या वेळेत एकूण ६ स्लॉट निश्चित करून प्रति स्लॉट ६०० पास दिले जातात.

# महापालिका निवडणुकीत काँग्रेस पक्ष देणार ५० टक्के नवीन उमेदवार

### मनपा निवडणुकी संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक, कार्यकर्त्यांना कामाला लागण्याचे निर्देश



*विदर्भ प्रजासत्ताक*

*दि. २६अमरावती–*

*आगामी मनपा निवडणुकांच्या अनुशंगाने काँग्रेस पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत मनपावर काँग्रेसचा झेंडा फडकावण्याचा निर्धार करण्यातआला. तसेच ५० टक्के नवीन उमेदवारांना या निवडणुकीत संधी देण्यावरही चर्चा करण्यात आली. काँग्रेसचे शहराध्यक्ष बबलु शेखावत यांनी उपस्थितीत पदाधिकारी व कार्यकर्त्यांना महानगरपालिकेत यश मिळविण्याकरिता तयारीला लागण्याचे निर्देश दिले. महानगर पालिका निवडणुकीच्या अनुषंगाने शहराध्यक्ष बबलु शेखावत यांच्या अध्यक्षतेमध्ये तसेच माजी महापौर विलास इंगोले, प्रदेश उपाध्यक्ष भैय्या पवार, माजी स्थायी समिती सभापती बाळासाहेब भुयार, माजी महापौर अशोक डोंगरे, जेष्ठ समाजसेवक हमीदभाई कुर्हेवाले, माजी नगरसेवक प्रदीप हिवसे, माजी नगरसेवक, माजी नगरसेवक धीरज हिवसे, माजी नगरसेवक अफजल चौधरी, माजी नगरसेवक सलीम बेग, महिला काँग्रेस अध्यक्षा जयश्री वानखडे, अल्पसंख्यांक सेल अध्यक्ष अब्दुल रफीक पत्रकार, समाजसेवक फिरोज खान, फिरोज शाह, यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शहर काँग्रेस पदाधिकारी व कार्यकर्त्यांचे चर्चा सत्र शनिवारी पार पडले, सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानुसार ४ महिन्यांमध्ये स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका घ्याव्या असे आदेश महाराष्ट्र सरकार व निवडणूक आयोगाला देण्यात आले आहे. पदविधर मतदार संघ व लोकसभा निवडणुकीत आपण काँग्रेस पक्षाला यश मिळवून दिले. काँग्रेस पक्षाची सत्ता स्थापन करायची आहे. नागरिकांवर लादलेला मालमत्ता कर, साफसफाईचा उडालेला बोजवारा, वाढती बेरोजगारी वमहागाई याने जनता त्रस्त झालेली आहे. काँग्रेसशिवाय दुसरा कुठलाही पर्याय उरलेला नाही. महानगरपालिकेत काँग्रेस पक्षाला यश मिळण्याचे चित्र अहवालामार्फत प्राप्त झालेले आहे. पत्रामध्ये शहरातील सर्व पदाधिकारी, कार्यकर्ते व काँग्रेसजणांनी एकत्रित मिळून पक्षबांधणी करून युद्धपातळीवर कार्य केल्यास महानगर पालिके मध्ये काँग्रेस पक्षाची सत्ता येत असल्याचे नमूद केलेले आहे.*





**ताऊ... तुम जियो हजारो साल ......**

अमरावतीचे पितृतुल्य, अमरावतीचा वैभव असणारे हनुमान व्यायाम प्रसारक मंडळचे सर्वेसर्वा पद्मश्री प्रभाकररावजी वैद्य यांच्या वाढदिवसानिमित मा खा सौ. नवनीत रवि राणा यांनी त्यांच्या घरी जाऊन आशीर्वाद घेतला

# शिष्यवृत्ती,नवोदय,NMMS,परीक्षांमध्ये प्राविण्य प्राप्त विदयार्थांचा गुणगौरव सोहळा संपन्न

## जिल्हा परिषद अमरावतीच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या हस्ते बक्षिस वितरण



### भातकुली पंचायत समिती शिक्षण विभागाचा स्तुत्य उपक्रम

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६भातकुली –** जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत पंचायत समिती भातकुलीच्या शिक्षण विभागातर्फे तालुक्यातील शिष्यवृत्ती,नवोदय,छचचड स्पर्धा परीक्षेत प्राविण्य प्राप्त विदयार्था,शिक्षक,केंद्र प्रमुख पालक यांचा गुणगौरव सोहळा रविवार दि.२५मे ला छत्रपती शिवाजी महाराज सभागृह पंजाबराव देशमुख महाविद्यालय शिवाजी नगर पंचवटी अमरावती येथे भव्य स्वरुपात संपन्न झाला. या गुणगौरव सोहळ्याचे उद्घाटन अमरावती जिल्हा परिषदच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता महापात्र यांच्या हस्ते दिप प्रज्वलनाने करण्यात आले.या वेळी भातकुलीचे गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे, शालेय पोषण आहार अधिक्षक नरेन्द्र गायकवाड ,शिक्षण विस्तार अधिकारी प्रविण खांडेकर, मो.अशफाक सर, शकील अहमद खाँ.,पंजाबराव पवार,केंद्र प्रमुख जानराव सुलताने,निता सोमवंशी,उमेश चुनकीकर,रविद्र धरमठोक,नरेंद्र धनस्कर,किशोर रुपनारायण,शैलेन्द्र दहातोंडे ,मुख्याध्यापक एस.एम.ठाकरे,गजानन मानकर,श्रीमती चेचरे मॅडम,रेहान सर,श्रीकृष्ण ठाकरे,गोपाल वडतकर,संतोष राऊत,हर्षवर्धन इंगळे,हेमंत कुंभलवार उपस्थित होते.जि.प,शाळा अंचलवाडीच्या विद्यार्थीनी स्वागत गीत सादर केले. मार्गदर्शन करतांना संजिता महापात्र म्हणाल्या विद्यार्थीनी स्पर्धे प्राविण्य प्राप्त केले त्याच प्रमाणे मोठेपणी एक आदर्श नागरीक म्हणुन झाला पाहीजे.शिक्षण विभागाचा प्राथमिक स्तरापासुनच स्पर्धा परीक्षा देणे आवश्यक आहे.याकरीता मार्गदर्शन करणार्या शिक्षकांचे,शिक्षण विषय तंज्ञ तसेच शिक्षण विभागाचे अधिकारी यांचे अभिनंदन.भातकुली तालुका यावर्षाला जिल्हातुन व्दितीर्य आला पुढच्या वर्षाला प्रथमवर असला पाहीजे अशी अपेक्षा व्यक्त केली.त्यांच्या हस्ते वर्ग ५वी शिष्यवृती मध्ये भातकुली तालुक्यातुन प्रथम आलेली दिव्या अटाळकर,व्दितीय पूर्वा बनसोड,तृतीय अनन्या नकाशे.वर्ग ८वी शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम नमन तलवारे,व्दितीय शेख मुसेफ शेख मोहसीन,तृतीय राशी पाटील,नवोदय परीक्षेत प्रथम क्रमांक निधी मोहोड,व्दितीय अदिती रावेकर आणि कु.उन्नती ओगले,कु.श्रृतीका औगड या दोन विद्यार्थीनी सन २०२४-२५ मध्ये जि.प.शाळा हातखेडा या शाळेतील प्रिय दर्शनी इंदिरा गांधी युनिट अंतर्गत 'सुवर्ण बाण'या राष्ट्रीय स्तरावरील परीक्षेत उत्तीर्ण झाल्या म्हणुन या सर्व विद्यार्थांचे स्मृतीचिन्ह,मेडल व प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी भातकुली तालुक्यातील वर्ग ५वी व ८वी मधिल शिष्यवृती परीक्षेत पास झालेल्या ३८५विद्यार्थी,एन.एम.एम.एस परीक्षा पास १२ आणि नवोदय परीक्षा पास २विद्यार्थांचा शिक्षक,पालक व मार्गदर्शक यांच्या उपस्थितीत मेडल व प्रमाणपत्र देऊन सन्मान करण्यात आला होता.उत्कृष्ट केंद्राचा पुरस्कार खोलापूर केंद्राचे केंद्र प्रमुख उमेश चुनकीकर,उत्कृष्ट शाळेचा पुरस्कार असजर हुसैन उर्दू विद्यालय खोलापूर यांना देण्यात आला.शिष्यवृत्ती स्पर्धा परीक्षे करीता मार्गदर्शन करणार्या भातकुली गटसाधन केंद्राच्या साधन व्यक्तीचा सन्मान महापात्र मॅडम यांनी केला.

# मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेअंतर्गत जिल्ह्यातील पहिले दोन प्रकल्प कार्यान्वित

## ३००० शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार असल्याने शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण

### उसळगव्हाण (देवगाव उपकेंद्र) आणि जळगाव मंगरूळ (मंगरूळ दस्तगीर उपकेंद्र) प्रकल्पातून निर्मिती होणार ६ मेगावॅट वीज



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती,–** मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजना २.० अंतर्गत जिल्ह्यातील उसळगव्हाण (देवगाव उपकेंद्र) आणि जळगाव मंगरूळ (मंगरूळ दस्तगीर उपकेंद्र) हे पहिले दोन सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आले आहे. प्रत्येकी ३ मेगावॅट क्षमतेच्या या दोन सौर प्रकल्पामुळे उपकेंद्र परिसरातील ३ हजार शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळणार असल्याने शेतकऱ्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.धामणगाव तालुक्यातील ३ मेगावॅट क्षमता असलेला उसळगव्हाण (देवगाव) सौर प्रकल्प हा १५ एकर शासकीय जमिनीवर तयार करण्यात आला असून या प्रकल्पातून तयार होणारी वीज ३३ केव्ही देवगाव उपकेंद्राला जोडण्यात आली आहे. त्यामुळे या उपकेंद्रातून निघणाऱ्या कृषी वाहिनीवरील पंधराशे शेतकऱ्यांना दिवसा विजेची सोय उपलब्ध झाली आहे.तसेच जळगाव मंगरूळ येथील सौर प्रकल्पाची क्षमताही ३ मेगावॅट असून १५ एकर शासकीय जमिनीवर उभारण्यात आला आहे. या प्रकल्पातून तयार होणारी वीज ३३ केव्ही मंगरूळ दस्तगीर उपकेंद्राला जोडण्यात आलेली असून यामुळे ३३ केव्ही मंगरूळ दस्तगीर उपकेंद्रातून वीज पुरवठा होणाऱ्या जवळपास १५०० शेतकऱ्यांना दिवसा वीज देणे शक्य होणार आहे.मुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रारंभ झालेल्या या शासनाच्या महत्वाकांक्षी प्रकल्पामुळे कृषी पंपांना दिवसा, अखंडीत व शाश्वत वीजपुरवठा शक्य होणार आहे. ऊर्जा सचिव श्रीमती आभा शुक्ला आणि महावितरणचे व्यवस्थापकीय संचालक श्री लोकेश चंद्र यांनी राज्यात या योजनेला गती दिली आहे. जिल्ह्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेसाठी ८४० एकर शासकीय जमीनीचे अधीग्रहन करण्यात आले आहे. या जमीनिवर ४४ ठिकाणी ४१ उपकेंद्रासाठी विकेंद्रीत सौर प्रकल्प उभारून या प्रकल्पातून १८४ मेगावॅट वीज निर्मिती करण्यात येणार आहे.

# पन्नालालनगर येथे मन कि बात कार्यक्रमाचे आयोजन

### मिलिंद बांबल यांचे नियोजन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती –** भारताचे लोकप्रिय पंतप्रधान ज्यांनी देशाचे नाव आंतरराष्ट्रीय स्तरावर गौरवाने उंचावले असे आदरणीय नरेंद्रजी मोदी साहेब यांच्या ऑपरेशन सिंदूर च्या यशस्वीकामगिरी नंतर आज रविवार २५ मे च्यामन कि बात कार्यक्रमाचे आयोजन भाजपा किसान मोर्चा शहर जिल्हा अध्यक्ष मिलिंद बांबल यांनी पन्नालाल नगर येथील जुगलकिशोर टावरी यांच्या निवासस्थानी केले होते आतापर्यंत झालेल्या प्रत्येक कार्यक्रमाचे आयोजन मिलिंद बांबल हे शहरातील विवीध भागात तसेच ग्रामीण भागात सुद्धा करतात प्रत्येक महिन्याच्या शेवटच्या रविवारला वेगवेगळ्या ठिकाणी कार्यक्रम आयोजित करून शासनाच्या योजनांची माहिति जनतेपर्यंत पोहचवतात व जनतेच्या काही समस्या असल्यास त्या सोडविन्यासाठी प्रयत्न करतात त्याच अनुषंगाने आज रविवारला सकाळी ११ वाजता मन कि बात कार्यक्रम आयोजित केला होता यावेळी लोकप्रिय पंतप्रधाननरेंद्र मोदी साहेब तसेच महाराष्ट्रातील मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या महायुती सरकारने देशहिताच्या जनकल्याणाच्या अनेक चांगल्या योजना सुरू केल्या तसेच सेवा , सुशासन , गरीबकल्याण च्या कार्यासोबत च शेतकरी ,महिला , युवक यांच्यासाठी खूप चांगले काम केले ऑपरेशन सिंदूर यशस्वी रीत्या राबवून अतिरेक्यांच्या मुसक्या आवळल्या त्यांचे अनेक सेंटर उध्वस्त केले आणि जगाला दाखवून दिले कि आम्ही कोणाला छेडत नाही आणी कोणी आम्हाला छेडले तर त्याला भारत सोडत नाही त्यांची संपूर्ण माहिती उपस्थित नागरिकांना देण्यात आली पंतप्रधान नरेंद्र मोदी , गृहमंत्री अमित शहा , सरक्षंण मंत्री राजनाथ सिंह तसेच भारतीय लष्कर ,भारतीय नौदल ,भारतीय वायुदल या तिन्ही सैन्य दलाचे उत्कृष्ट कामगिरी बद्दल अभिनंदन करण्यात आले कार्यक्रमाला भाजपा किसान मोर्चा अध्यक्ष मिलिंद बांबल ,जुगलकिशोर टावरी , दीपक अनासाने , लक्ष्मणराव धानोरकर , अनिल काळे ,दीपक बांबल , गजानन गतफणे , संतोष चांडक , राकेश बुंदेले ,पनु गुल्हाने , राहुल धर्माळे , अभिजीत रौरासे , प्रवीण तेलंगे , मनोज राऊत , रोशनउमक , अविनाश मालोदे , पंजाबराव बुढाळकर , मनोज जावरकर , अमित इंगळे , सचिन आलाटकर , सुनील तेलंगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

# दुसरी मुलगी झाली म्हणून टोमणे; अमरावतीत 'सीएचओ'ची आत्महत्या

## पतीसह पाच जणांविरूद्ध एफआयआर

**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती–** पुण्याच्या मुळशीमधील हगवणे कुटुंबातील वैष्णवीच्या आत्महत्येची घटना राज्यभर गाजत असताना, अमरावतीच्या जयभोले कॉलनीतही रविवारी सकाळी तशीच धक्कादायक घटना घडली. पती आणि सासरच्या मंडळींच्या अनन्वित छळाला कंटाळून येथील एका ३२ वर्षीय अधिकारी सीएचओ महिलेने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केली.

शुभांगी नीलेश तायवाडे (३२, रा.जयभोले कॉलनी, तपोवन, अमरावती) असे मृत विवाहितेचे नाव आहे. दुसऱ्यांदा मुलगी झाल्याने पतीसह सासू, भासरा व नणंदेने तिचे जगणे कठीण केले होते. रविवार, २५ मे रोजी सकाळी ८ ते ९ च्या दरम्यान ती घटना उघड झाली. शुभांगी या सीएचओ (सामुदायिक आरोग्य अधिकारी) म्हणून कार्यरत होत्या.या प्रकरणी मृत शुभांगीच्या वडिलांच्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी रविवारी दुपारी मृताचा पती नीलेश (३५), भासरा नितीन (३८), सासू (७०), नणंद व भाचा या पाच जणांविरुद्ध आत्महत्येस प्रवृत्त



केल्याचा गुन्हा दाखल केला. मृताचा पती, सासू व नणंदेस ताब्यात घेण्यात आले आहे. १३ महिने वयाच्या मुलीला पाळण्यातून बाहेर बेडवर ठेवत शुभांगीने पाळण्याच्या दोरीने आत्मघात केला. तर तिची अडीच वर्षांची दुसरी मुलगी हॉलमध्ये खेळत होती. आरोपी पती निलेश हा बँक मॅनेजर आहे. नोव्हेंबर २०२१ मध्ये शुभांगीचे लग्न झाले होते. निलेशने तिला नोकरी सोडण्याचाही तगादा लावला होता.

# पावसाळा तोंडावर, यंदाच्या खरिपात ३१ लाख हेक्टरमध्ये पेरणीचे नियोजन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६अमरावती** १५जूनच्या पहिल्या आठवड्यात राज्यात मान्सून धडकणार असल्याची शुभवार्ता भारतीय हवामान विभागाने दिली आहे. या पार्श्वभूमीवर खरीप हंगामाची तयारी शेतकऱ्यांसह कृषी विभागाने केली आहे. पश्चिम विदर्भात यावेळी ३१ लाख हेक्टरमध्ये खरिपाचे क्षेत्र राहणार आहे.

विभागात यावर्षी ३०.६३ लाख हेक्टर क्षेत्र प्रस्तावित केले आहे. यामध्ये सर्वाधिक १५.१६ लाख हेक्टर म्हणजेच प्रस्तावित क्षेत्राच्या ४७.६७टक्के क्षेत्र सोयाबीनचे राहणार आहे. तर कपाशी १०.८६ लाख हेक्टर (३४.५५ टक्के) व तूर ४.६१ लाखहेक्टर (१४.६९ टक्के), मका ५.२२ लाख हेक्टर, ज्वारी १.१० लाख हेक्टर, मूग १.३२ लाख हेक्टर, उडीद १.३१ लाख हेक्टर व इतर पिकांचे ८०.१६ लाख हेक्टर क्षेत्र राहणार असल्याचे कृषी सहसंचालक कार्यालयाने सांगितले.यावर्षी कपाशीच्या बियाण्यांसाठी किमान ५४.३३ लाख पाकिटे लागणार आहेत. १५ मेपासून बीटी बियाण्यांची विक्री सुरू झालेली आहे. सद्यस्थितीत २७.३० लाख पाकिटे मार्केटमध्ये उपलब्ध झालेली आहेत. शिवाय सोयाबीनसाठी ३.९७ लाख क्विंटल बियाण्यांची मागणी असून, सद्यःस्थितीत १.०३ लाख क्विंटल उपलब्ध आहे. शिवाय बहुतांश नागरिक घरगुती बियाण्यांचा करणार आहेत.

# या पुढे... किरीट सोमय्यांच्या बैठकांवर तहसीलदारांचा बहिष्कार

## दबाव टाकत असल्याचा आरोप, तहसीलदार संघटनेचे जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



**विदर्भ प्रजासत्ताक दि.२६ अमरावती–** माजी खासदार किरीट सोमय्या यांनी तहसीलदार व नायब तहसीलदारांवर अर्जदारांविरुद्ध फौजदारी कारवाई करण्याचा दबाव टाकल्याचा आरोप महाराष्ट्र राज्य तहसीलदार, नायब तहसीलदार संघटनेने केला आहे. या पार्श्वभूमीवर महसूल अधिकाऱ्यांनी सोमय्या यांचा प्रस्तावित दौरा व बैठकांवर बहिष्कार घालण्याचा निर्णय घेत जिल्हाधिकाऱ्यांना यासंदर्भात निवेदन सादर केले.महसूल विभागाच्या १७ मार्च २०२५ रोजीच्या आदेशानुसार, ११ ऑगस्ट २०२३ पासून ते स्थगिती आदेशापर्यंत नायब तहसीलदारांनी निर्गमित केलेली विलंबित जन्म प्रमाणपत्रे रद्द करण्यात आली आहेत. तरीही किरीट सोमय्या हे वारंवार अमरावती जिल्ह्यातील अनेक तहसील कार्यालयांत भेटी देऊन अधिकारी व कर्मचाऱ्यांवर जन्म, मृत्यू नोंदीसंदर्भात फौजदारी कारवाईची मागणी करतात. शिवाय अर्जदारांवर फौजदारी कारवाई करा, अन्यथा तुमच्यावर गुन्हा दाखल करेन, अशा प्रकारे दबाव टाकत असल्याचा आरोप संघटनेच्या निवेदनात करण्यात आला.सोमय्या यापुढे अमरावती जिल्ह्यात कुठेही दौऱ्यावर असल्यास महसूल अधिकारी त्यांच्या बैठकींना उपस्थित राहणार नाहीत. त्यांचा अमरावती दौरा व सभांवर बहिष्कार टाकण्यात येत असल्याचे निवेदन संघटनेद्वारा जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना देण्यात आले. यावेळी संघटनेचेयावेळी संघटनेचे जिल्हाध्यक्ष विजय लोखंडे, एसडीओ तेजश्री कोरे, तहसीलदार अश्विनी जाधव, प्रदीप शेवाळे, पुष्पा दाभेराव, पूजा माटोडे, अभय घोरपडे, मयूर कळसे, राम शेवाळे, विनोद वानखडे यांच्यासह सर्व नायब तहसीलदार उपस्थित होते.–

# मेळघाटात मे महिन्यात धुक्याची दरी : निसर्गाची किमया न्यारी

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती



मेळघाटातील चिखलदरा आणि परिसर सध्या पूर्वमोसमी पावसाच्या सरींनी चिंब झाला असून, निसर्गाच्या अद्भूत सौंदर्याने तो अधिकच बहरला आहे. मेळघाटात खोल दऱ्यांमध्ये दाटलेले पांढरेशुभ्र धुके आणि सर्वत्र पसरलेली मनमोहक हिरवळ डोळ्यांना एक वेगळाच आनंद देत आहे. गेल्या काही दिवसांतील पावसामुळे येथील वातावरण अत्यंत आल्हाददायक बनले आहे.

झाडे आणि वेलींवर चमकणारे पावसाचे थेंब, दाट धुक्याची चादर यामुळे जणू काही ढग जमिनीवर उतरल्याचा भास होतो आहे. या धुक्यातून वाट काढताना पर्यटक एका वेगळ्याच दुनियेत गेल्याचा अनुभव घेत आहेत.

निसर्गाच्या या सोहळ्याचा अनुभव घेण्यासाठी पर्यटक मोठ्या संख्येने चिखलदऱ्यात गर्दी करीत आहेत. पावसाळी वातावरणात मेळघाटातून प्रवास करताना मिळणारा अनुभव अविस्मरणीय असल्याचे पर्यटक सांगत आहेत. या निसर्गरम्य वातावरणातील क्षण कॅमेरात कैद करीत आहेत.

सध्या विदर्भात मोसमी पावसाचे आगमन झालेले नसले, तरी या पूर्वमोसमी पावसाने मेळघाट परिसराला संजीवनी दिली आहे. उन्हाळ्याच्या काहिलीनंतर पडणाऱ्या या पावसामुळे वातावरणात कमालीचा गारवा निर्माण झाला आहे. पावसाळ्यापुर्वीच घाटात असे आल्हाददायक वातावरण निर्माण झाल्याने आगामी पावसाळ्यात मेळघाटाचे सौंदर्य आणखी किती बहरेल, याची उत्सुकता स्थानिक नागरिकांना आणि पर्यटकांना लागली आहे. निसर्गाच्या या अप्रितिम रुपाचे दर्शन घेण्यासाठी पर्यटक दमदार पावसाळ्याची आतुरतेने वाट पाहात आहेत.

एरवी मे महिना हा अत्यंत उकाड्याचा असतो. थंड हवेचे ठिकाण असलेल्या चिखलदरा येथे पर्यटक गारव्याचा अनुभव घेण्यासाठी येत असतात. पण, गेल्या काही वर्षांत चिखलदरा येथेही उष्णता वाढल्याचे पर्यटक सांगतात. पण, यंदा मेच्या अखेरीस निसर्गाची वेगळी किमया पर्यटक अनुभवत आहेत.

चिखलदरा पर्यटनस्थळासह परिसरात रविवारी दुपारी दोन तास पावसाने दमदार हजेरी लावली. सकाळी पांढरे शुभ्र दाट धुके पसरले होते. त्यामुळे शनिवार, रविवार नजीकचे पर्यटनस्थळ म्हणून आलेल्या पर्यटकांना आल्हाददायी वातावरण अनुभवता आले. सिपना नदी सेमाडोह परिसरातून वाहते. त्या भागासह मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या जंगलात दमदार पावसाने हजेरी लावली आहे. वातावरण निसर्गसंपन्न झाले आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प अंतर्गत सिपना वन्यजीव विभागात यंदा सर्वाधिक प्रमाणात आगीच्या घटना घडल्या. त्यामुळे बुद्ध पौर्णिमेला प्राणी गणनेत मचानीवर कुठल्याच प्रकारच्या सुविधा वन्यप्रेमींना उपलब्ध झाल्या नाहीत. कोसळलेला मुसळधार पाऊस जंगलातील आग रोखण्यास योग्य ठरला असून खळखळणाऱ्या पावसामुळे नदी, नाले ओसंडून वाहू लागले आहेत.

# हरिना फाउंडेशन आणि स्व. लिलाबेन मंगलजीबेन पोपट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप शिबिर

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती



ईशदया मदर तेरेसा होम मिशनरी ऑफ चॅरिटी, ज्ञानमाता हायस्कूल अमरावती येथे रविवार, दिनांक २५ मे २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत नेत्र तपासणी व मोफत चष्मा वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. हा उपक्रम हरिना फाउंडेशन आणि स्व. लिलाबेन मंगलजीबेन पोपट फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात आला.शिबिरात अनेक गरजू नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली आणि काहीना मोफत चष्मेही वितरित करण्यात आले. आरोग्य सेवा आणि सामाजिक उत्तरदायित्व याची जाणीव ठेवत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा ९६ दिव्यांग, वयोवृद्ध, मतिमंद, निराधार लोकांनी लाभ घेतला, यापैकी ४३ लोकांना स्व. लिलाबेन मंगलजीभाई पोपट फाऊंडेशनचे अध्यक्ष वह हरिना फाउंडेशन चे कार्यकारी अध्यक्ष चंद्रकांत पोपट यांच्या वतीने मोफत चश्मा वाटप करण्यात आले. तर नेत्र तपासणी हरीना फाउंडेशनच्या वतीने डॉक्टर दिनेश वरदानी यांनी केली.या कार्यक्रमाच्या प्रमुख उपस्थितींमध्ये चंद्रकांत पोपट, राम प्रकाश गिल्डा, शरद कासट, राजेन्द्र वर्मा, संजय भूतडा, प्रमोद राठी, हर्षाली विजयकर, मनिष सावला, डॉ. दिनेश वरदानी, सिस्टर एम्मा (सुपिरिअर), सिस्टर रोसिन (इनचार्ज), डॉ. स्मिता साठे (सोशल वर्कर), चित्रा दिदी, खुशबू दिदी, जनसेवक महेश मूलचंदानी, मंगला गावंडे, दिलीप गावंडे आणि अनमोल यांचा समावेश होता.या उपक्रमामुळे सामाजिक भान जपणार्या संस्था आणि कार्यकर्त्यांचे कौतुक होत आहे. या स्तुत्य उपक्रमाने गरजूंच्या डोळ्यांना नवा प्रकाश दिला आहे.

## जिल्हाधिकारी आशिष येरेकर आता बुधवारी स्वीकारणार पदभार

विदर्भ प्रजासत्ताक दि.२८अमरावती



अमरावतीचे नवे जिल्हाधिकारी आशिष येरेकर आता बुधवार, २८ मे रोजी पदभार स्वीकारणार आहेत. त्यामुळे मावळते जिल्हाधिकारी सौरभ कटियार हेही त्याच दिवशी मुंबई उपनगर येथील नवी जबाबदारी स्वीकारण्यासाठी रवाना होणार आहेत. राज्य शासनाने गेल्या बुधवारी राज्यातील काही महसूल अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या. त्यामध्ये कटियार यांचाही समावेश आहे. अहिल्यानगर जि. प.चे सीईओ आशिष येरेकर यांची अमरावतीच्या जिल्हाधिकारीपदी नियुक्ती केली आहे. २०१८ च्या तुकडीचे आयएएस अधिकारी असलेले बेरेकर यांना प्रथमच जिल्हाधिकारी पद प्राप्त झाले. दरम्यान बुधवारी नवनी पदभार घेण्यासाठी ते मंगळवारी रात्रीच येथे येतील, अशी माहिती आहे.

# नेरपिंगळाई येथे सैनिकाच्या सन्मानार्थ भव्य तिरंगा रॅलीचे आयोजन



विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६नेरपिंगलाई

पहलगाम येथील हल्ल्यानंतर भारत पाक युद्ध वेळी केंद्र सरकारकडून राबवीण्यात आलेल्या ऑपरेशन सिंदुरच्या अभुतपूर्व यशानंतर भारतीय सेनादलाच्या शौर्याचे कौतुक व कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी रविवार रोजी सायंकाळी पाच वाजता नेर पिंगळाई येथे तिरंगा यात्रा आयोजन समितीच्या वतीने नेर पिंगळाई शहरातून तिरंगा रॅली काढण्यात आली या रॅलीला परिसरातील नागरिकांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. तिरंगा रॅली ला सुरुवात करण्यापूर्वी बाजार चौकात भारत मातेच्या फोटोचे पूजन करण्यात आले.त्यानंतर तीवसा मतदार संघाचे आमदार राजेश वानखडे व भारतीय जनता पार्टीचे रविराज देशमुख यांच्या हस्ते माजी सैनिकांचा शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. व भव्य तिरंगा रॅलीला नागरिकांनी हातामध्ये राष्ट्रीय ध्वज घेऊन सुरुवात करण्यात आली. रॅलीमध्ये वंदे मातरम भारत माता की जय छत्रपती शिवाजी महाराज की जय अशा घोषणा देण्यात आल्या. नंतर राष्ट्रगीताने रॅलीची सांगता करण्यात आली या रॅलीला तिवसा विधानसभेचे आमदार राजेश वानखडे, जिल्हाध्यक्ष रविराज देशमुख, आरतीताई वानखडे, व समस्त गावकरी मंडळी व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने या एकता रॅलीला उपस्थित होते.तिरंगा रॅली दरम्यान कुठलाही अनुचित प्रकार घडू नये याकरिता शिरखेड पोलीस स्टेशनचे ठाणेदार सचिन लुले हे कर्मचाऱ्यासह बंदोबस्ताकरिता हजर होते.

# मान्सूनपूर्व पावसामुळे लांब पल्ल्याच्या रेल्वेंना विलंब

## जबलपूर-अमरावती, गीतांजली, महाराष्ट्र, एलटीटी, पोरबंदर एक्स्प्रेसला एक ते तीन तास उशीर, प्रवासी त्रस्त

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती



मान्सूनपूर्व वं पाऊस तसेच प्रवाशांच्या गर्दीमुळे सध्या नागपूर-अमरावती, नागपूर-बडनेरा, बडनेरा ते मुंबई, पुणे व अहमदाबादकडे जाणाऱ्या लांब पल्ल्याच्या एक्स्प्रेस रेल्वे एक ते तीन तास उशिरा धावत आहेत. त्यामुळे प्रवाशांची गैरसोय होत आहे. वेळेआधी स्टेशनवर आल्यावर या गाड्या उशिरा धावत असल्याचे कळाल्यानंतर प्रवाशांना मनःस्ताप होत आहे.

सध्या उन्हाळी सुट्यांचा कालावधी, लग्नसराई, पर्यटनासाठी रेल्वेचे आरक्षण फुल्ल असून, ऐनवेळी आवश्यक काम असल्याने अनेक प्रवासी जनरल डब्यांमधून नाइलाजाने प्रवास करत आहेत. जनरल डब्यांतही पाय ठेवायला जागा मिळणार नाही, अशी गर्दा आहे. नागपूरहून सकाळी ६.३० वाजता मुंबईकडे निघणारी जबलपूर-अमरावती एक्स्प्रेस नागपूर स्टेशनवर १ तास उशिरा आली. त्यामुळे अमरावतीला येण्यास तिला उशीर झाला. एरव्ही जबलपूर एक्स्प्रेस वेळेवर धावत असते. त्याचप्रमाणे नागपूर-बडनेरा, बडनेरा ते मुंबई, पुणे व अहमदाबादकडे जाणाऱ्या बहुतेक गाड्या उशिरा धावत आहेत. हावडा-मुंबई गीतांजली एक्प्रेस ही २ तास १५ मिनिटे, एक्स्प्रेसला एक्स्प्रेस २ तास २० मिनिटे, महाराष्ट्र एक्स्प्रेस १ तास १० मिनिटे, हावडा-मुंबई ३ तास, पोरबंदर ४ तास ३० मिनिटे, नवजीवन एक्स्प्रेस ३० मिनिटे ते ४५ मिनिटे, हावडाकडून बडनेरा मार्गे पुण्याला जाणारी आझाद हिंद ४ तास उशिरा धावतअसल्याने प्रवाशी त्रस्त झाले आहेत. गाड्या येण्याच्या १५ ते ३० मिनिटे आधी रेल्वेस्टेशनवर पोहोचलो की, धावपळ होत नाही. परंतु, त्यातही एक्स्प्रेस गाड्या ३० मिनिटे ते ३ तासांपर्यंत उशिरा धावत असतील तर वैताग येतो. विशेष म्हणजे रेल्वेचे ॲप कधीच योग्य प्रकारे काम करत नाही. नेट कनेक्टिव्हिटी चांगली नसेल तर तेही गाड्यांचे लोकेशन व्यवस्थित दाखक्त नाही. त्यामुळे आम्ही योग्य वेळी स्टेशनवर पोहोचण्याचा प्रयत्न करतो. परंतु, येथे आल्यावर गाड्या लेट असल्याचे कळल्यावर दोन ते तीन तास थांबावे लागते, अशा प्रतिक्रिया प्रवाशांनी व्यक्त केल्या.

### मूर्तिजापूर पुढे ओव्हरहेड वायर तुटल्याने अंबा एक्स्प्रेस खोळंबली

मूर्तिजापूरजवळ अमरावती - सीएसएमटी अंबा एक्स्प्रेसला वीज पुरवठा करणारी ओव्हरहेड तार तुटल्यामुळे दोन तास खोळंबली. यामुळे हावडा-मुंबई मार्गावरील रेल्वे वाहतूक विस्कळीत झाली. परिणामी प्रवाशांचेही हाल झाले. मूर्तिजापूर ते माना रेल्वे स्टेशनदरम्यान शनिवारी रात्री ही घटना घडली. रात्री ८ ते १० वाजेपर्यंत ओव्हरहेड तार काम करण्यात आले. परंतु, मार्गावरील बहुतेक एक्स्प्रेस,विविध स्टेशनवर रोखल्या होत्या. तसेच माना रेल्वे स्टेशनवर विदर्भ एक्स्प्रेसच्या इंजिनमध्ये बिघाड झाल्याने तीसुद्धा खोळंबली होती. दोन्ही रेल्वे गाड्यांमधील प्रवासी त्रस्त झाले होते.

# १२ वीची लेखी २४ जून ते १६ जुलै, १० वीची २४ जून ते ८ जुलैपर्यंत

## दहावी आणि बारावी पुरवणी परीक्षेचे वेळापत्रक निश्चित

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती

महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे जून-जुलै २०२५ मध्ये घेतल्या जाणाऱ्या इयत्ता दहावी व बारावीच्या पुरवणी परीक्षेचे वेळापत्रक जाहीर झाले आहे. इयत्ता बारावीची लेखी परीक्षा २४ जून ते १६ जुलै या कालावधीत तर दहावीची परीक्षा २४ जून ते ८ जुलै या कालावधीत घेतली जाणार आहे.

राज्य माध्यमिक शिक्षण मंडळातर्फे पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, मुंबई, कोल्हापूर अमरावती, नाशिक, लातूर व कोकण यांना विभागीय मंडळामार्फत जून-जुलै २०१५ मध्ये इयत्ता दहावी व बारावीमधील विद्यार्थ्यांची पुरवणी परीक्षाघेतली जाणार आहे. राज्य मंडळाच्या संकेतस्थळावर परीक्षेचे विषय निहाय वेळापत्रक उपलब्ध करून देण्यात आले आहे. विद्यार्थी ु.ारहरहीललेरीव.ळप या संकेतस्थळावर भेट देऊन वेळापत्रक पाहू शकतात. मंडळाच्या संकेतस्थळावरील वेळापत्रक हे फक्त माहितीसाठी आहे. परीक्षेपूर्वी राज्य मंडळातर्फे छापील स्वरूपात देण्यात येणारे वेळापत्रक अंतिम असणार आहे. विद्यार्थ्यांनी छापील वेळापत्रकावरूनच परीक्षेच्या तारखांची खात्री करून घेणे आवश्यक आहे. अन्य संकेतस्थळावरील किंवा अन्य यंत्रणेने छापलेले किंवा सोशल मीडियाच्या माध्यमातून व्हायरल झालेले वेळापत्रक विद्यार्थ्यांनी ग्राह्य धरू नये, असेही आवाहन राज्य मंडळाने केले आहे.

# संतापलेल्या नागरिकांकडून महावितरण कार्यालयात तोडफोड : शहरातील लक्ष्मी नगरातील घटना

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती




शहरातील कॉटन मार्केट परिसरात वीजपुरवठा खंडित होताच संतप्त नागरिकांनी लक्ष्मी नगरात असलेल्या महावितरणच्या तक्रार निवारण केंद्रात जाऊन तोडफोड केल्याची घटना शनिवारी रात्री ११ वाजताच्या सुमारास घडली. याप्रकरणी महावितरणने गाडगेनगर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे.

मागील काही दिवसांपासून शहरातील काही भागांमध्ये वारंवार वीजपुरवठा खंडित होत आहे. शहरातील कॉटन मार्केट, लक्ष्मीनगर परिसरात असलेल्या महावितरण केंद्रामधून वीजपुरवठा होणाऱ्या भागामध्ये शनिवारी रात्री साडेदहा वाजताच्या ब्रेकडाऊनमुळे वीजपुरवठा खंडित झाला होता. वीजपुरवठा खंडित होताच या भागातील नागरिकांनी त्या केंद्रावर एकत्र येण्याससुरुवात केली. शुक्रवारी रात्रीदेखील या भागातील वीजपुरवठा खंडित झाल्याने नागरिकांना अर्धी रात्र अंधारात काढावी लागली होती. त्यामुळे पुन्हा रात्र अंधारात काढावी लागणार असल्याने संतप्त नागरिकांनी उपकेंद्र कार्यालयात जाऊन उपस्थित कर्मचाऱ्यांना जाब विचारला. यावेळी कर्मचाऱ्यांनी ब्रेकडाऊनमुळे विद्युत पुरवठा खंडित झाल्याचे सांगून वीजपुरवठा सुरळीत करण्याचे काम सुरू असल्याचे सांगितले. परंतु, संतप्त नागरिकांनी कार्यालयात असलेल्या खुर्च्या फेकण्यास सुरुवात केली.

> ब्रेकडाऊनमुळे विद्युत पुरवठा रात्री साडेदहा वाजताच्या सुमारास खंडित झाला. काहींनी कार्यालयात येऊन, खुर्च्या फेकून तोडफोड करण्याचा प्रयत्न केला. दीड ते दोन तासांत तेथील विद्युत पुरवठा सुरळीत केला.
>
> **सुधीर वानखडे,**
> **अतिरिक्त कार्यकारी अभियंता भाग-२,**
> **महावितरण**

# कामगार आयुक्तालयासमोर प्रहारचे फाशी आंदोलन

विदर्भ प्रजासत्ताक
दि.२६अमरावती



महाराष्ट्र शासनाने सुरक्षारक्षकांच्या भरतीबाबत काढलेल्या नव्या परिपत्रकाचा विरोध करण्यासाठी प्रहार जनशक्ती पक्षाच्या कामगार संघटनेतर्फे अमरावती येथील सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालयासमोर फाशी आंदोलन सुरू करण्यात आले आहे.

शासनाने काढलेल्या नव्या परिपत्रकानुसार सुरक्षा रक्षकाच्या भरतीसाठी शैक्षणिक पात्रता आणि शारीरिक चाचण्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत.या बदलांमुळे सध्या कार्यरत असलेले सुरक्षा रक्षक बेरोजगार होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे या परिपत्रका विरोधात प्रहार संघटनेने सोमवारपासून सहायक कामगार आयुक्त कार्यालयासमोर फाशी आंदोलन सुरू केले आहे, शनिवार पर्यंत याबाबतीत कुठलाही निर्णय न घेतल्यास आंदोलन अधिक तीव्र करण्याचा इशारा प्रहार तर्फे देण्यात आला आहे.

# ३१ मे ला होणार पंढरपूरकरिता रुक्मिणी मातेच्या पालखीचे होणार प्रस्थान : पायदळ दिंडीचे यंदाचे ४३१ वे वर्ष



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२४कुऱ्हा**

३१ मे२०२५ ला श्री तिर्थक्षेत्र कौंडण्यपूर ते श्री तीर्थक्षेत्र पंढरपूरकरिता रुक्मिणी मातेच्या पालखीचे प्रस्थान दुपारी ४ वा. श्री विठ्ठल रूक्मिणी संस्थान येथून होणार आहे. तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर हे विदर्भातील पुरातन तीर्थक्षेत्र आहे, तसेच आई रूक्मिणी मातेचे आणि पाच सतीचे माहेर आहे.

प्रभू श्रीरामचंद्राची आजी राजा दशरथाची आई इंदुमती अगस्थी, ऋषीची पत्नी लोपा मुद्रा, भगीरथ राजाची माता केशिनी व नल राजाची राणी दमयंती तसेच चौरंगी नाथाचे जन्मस्थान आहे. महाभारत कालीन या पुरातन तीर्थक्षेत्रात श्री रुक्मिणी मातेचे जन्मस्थान आणि पाच सतीचे माहेर आहे. जवळच श्री अंबिका मातेचे पुरातन मंदिर आहे याच मंदिरातून भगवान श्रीकृष्णाने श्री रूक्मिणी मातेचे हरण केले होते. श्रीमद् भागवतात याचा उल्लेखदेखील आहे.


वशिष्ठा (आजची वर्धा) नदीच्या काठावर असलेल्या या पुरातन तीर्थक्षेत्रात हे पुरातन मंदिर आहे. जवळपास ४५१ वर्षापूर्वी श्री संत सदाराम महाराज होऊन गेले. श्री संत सदाराम महाराजांनी श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर ते श्री तीर्थक्षेत्र पंढरपूर अशी वारी सन १५९४ साली सुरू केली. ती परंपरा आजही सुरू असून वारीचे पायदळ दिंडीचे हे ४३१ वे वर्ष आहे. श्री रूक्मिणी मातेच्या माहेरहून ३१ मे २०२५ ला प्रस्थान होणार असून ही माहेरची महाराष्ट्रातील एकमेव मानाची पालखी आहे.तरी भाविक भक्त वारकरी मंडळी यांनी पालखी सोहळा कार्यक्रमाला उपस्थित राहावे, असे आवाहन अध्यक्ष/विश्वस्त मंडळ श्री विठ्ठल रूक्मिणी संस्थान श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर यानी केले आहे. तसेच आषाढी पंढरपूर यात्रा श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर ते श्री तीर्थक्षेत्र पंढरपूर रपूर या या पायदळ पायदळ पालखी सोहळ्यात वारकरी यांनी नोंदणी मंदिरांचे कार्यालय येथे संपर्क साधून पर्क साधून रीतसर अर्ज भरून नोंदणी करून घ्यावी, असे आवाहन अध्यक्ष / विश्वस्त मंडळ श्री विठ्ठल रूक्मिणी संस्थान श्री तीर्थक्षेत्र कौंडण्यपूर यांनी केले आहे.

# मोबाईलबाबत विचारताच दुचाकीस्वारावर उगारली काठी

## पार्किंगच्या जागेवर वास्तव्य, लोकांना मारहाण, व्यापारी हैराण हिंदू गांधी सेनेचे प्रदेशाध्यक्ष हेमंत मालवीय यांची मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

स्थानिक राजकमल चौकात उड्डाण पुलाखाली घुमंतू लोकांच्या अनेक गटांनी वास्तव्य केले असल्याने वाहन धारकांना वाहन लावतांना त्रास होत आहे. तसेच त्या लोकांचा हैदोस जास्त वाढल्याने व्यापारी वर्ग देखील हैराण झालेला आहे. त्यांनी राजकमल चौकासह नेहरू मैदानात आपल्या वस्त्या बनविल्याने तेथे घाणीचे साम्राज्यनिर्माण झाले. काही दिवसांपूर्वी एका दुचाकीस्वाराने मोबाइल बाबत विचारल्यने त्या लोकांनी दुचाकीस्वारावर काठी उगारून प्रचंड राडा केला होता. त्यामुळे घुमंतू लोकांवर तातडीने कारवाई करावी, अशी मागणी हिंदु गांधी सेनेचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष हेमंत मालवीय यांनी पोलिस प्रशासनाकडे केली आहे.



हेमंत मालवीय यांच्या तक्रारीनुसार, घुमंतू लोकांनी राजकमल व राजापेठ उड्डाण पुलाखाली आपले बस्ताण मांडले आहे. ते उघड्यावरच मासांहर शिजवून खातात आणि रस्त्यावर कचरा फेकतात. विकण्याचे साहित्य घेऊनचौकातफिरत असल्याने वाहनधारकांना प्रचंड त्रास होतो. एखाद्या वाहन चालकाचा साधा कट जरी लागला तर संपूर्ण समुह त्यांच्यासोबत राडा करतो. काही दिवसांपूर्वी असाचप्रकार हेमंतमालवीययांच्यामित्रासोबत राजकमल चौकात घडला. त्या व्यक्तीने राजकमल चौकात उड्डाण पुलाखाली दुचाकी इन पार्क केली होती. दुचाकी काढताना त्यांना खिशात मोबाइल दिसला नाही म्हणून बाजूला असलेल्या लोकांना विचारले असता त्यांनी त्या व्यक्तीवर मारायला काठी उगारून प्रचंड राडा अ केला. जमाव जमल्याने वाहतुक पोलिसांनी त्यांना आवरण्याचा प्रयत्न केला. परंतु, जमावाने प्रचंड हैदोस घातला. घुमंतुच्या या हैदोसामुळे वाहन धारकांसह राजकमल, राजापेठ चौकातील व्यापारी सुध्दा चांगलीच त्रस्त झाले आहे असल्याने त्यांच्या तातडीने कारवाई करावी, अशी मागणीहेमंत मालवीययांनी केली आहे.

त्याचप्रमाणे हेमंत मालवीय यांनी नेहरू मैदान हे कचऱ्याचे मैदान बनले असल्याचा मुद्दा सर्वात आधी उघड केला होता. शहराच्या मध्यवर्ती भागातील राजकमल चौकाजवळ असलेली लाल डब्बा शाळा म्हणून प्रसिद्ध मनपा शाळा ही प्रत्यक्षात महान स्वातंत्र्यसैनिक स्व. नानासाहेब गोखले यांच्या स्मृती प्रित्यर्थ बांधण्यात आलेली स्मारके इमारत आहे.याइमारतीचे लोकार्पण देशगौरव नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या हस्ते झाले होते. याच शाळेच्या विशाल प्रांगणाला नेहरू मैदान म्हणतात.

परंतु गेल्या काही काळापासून या इमारतीची अवस्था खूपच खराब झाली आहे. मैदानात ठिकठिकाणी कचऱ्याचे आणि घाणीचे ढीग साचलेले दिसत आहेत. अमरावती शहराच्या दृष्टीने ऐतिहासिक महत्त्व असलेल्या नेहरू मैदानाच्या स्वच्छतेकडे मनपा दुर्लक्ष करत आहे, हे अतिशय गंभीर आणिलज्जास्पद आहे. या दुर्लक्षामुळे काही काळापासून फिरत्या समुदायातील लोकांनी या मैदानात आपले घरटे वसवले आहे आणि त्यांच्याद्वारे मैदानात सर्वत्र घाण केली जात आहे. तसेच संपूर्ण शहरातील कचरा उचलून नेहरू मैदानात टाकला जातो, ज्यामुळे हे मैदान एका कचरा डिपोमध्येच रूपांतरित झाल्यासारखे वाटते. त्यामुळे तेथील कचरा तात्काळ हटविण्याची मागणी देखील सर्वात आधी हेमंत मालवीय यांनी केली होती. त्याबाबत त्यांनी फेसबुकवर व्हिडीओ देखील अपलोड केला होता. हे विशेष.

# कैरीच्या लोणच्यासाठी महिलांची लगबग, अवकाळी पावसामुळे दर वाढले मात्र गृहिणींचा उत्साह कायम

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६अमरावती**

मे महिना आला की, बाजारपेठेत कैरींची रेलचेल सुरू होते. गृहिणींची पावले वाळवणानंतर आता लोणच्याकडे वळत आहेत, आणि त्यासाठी बाजारात कैरी खरेदीची लगबग वाढली आहे. यावर्षी अवकाळी पावसाने कैरीच्या उत्पादनावर परिणाम केला आहे, त्यामुळे कैरीचे दर काहीसे वाढले आहेत. तरीही, चविष्ट आणि आरोग्यदायी घरगुती लोणचे बनवण्यासाठी गृहिणी उत्साहाने तयारीला लागल्या आहेत. बाजारात लोणच्यासाठी लागणाऱ्या कैऱ्या मोठ्या प्रमाणात विक्रीस आल्या आहेत.

### कैरीच्या लोणच्याची क्रेझ

मे महिन्यात कैरीचा हंगाम जोरात सुरू होतो. या काळात बाजारात कच्च्या कैऱ्यांची रेलचेल असते, आणि गृहिणी लोणचे बनवण्यासाठी उत्साहाने खरेदीला निघतात. घरगुती लोणचे केवळ चवीनेच नव्हे, तर आरोग्याच्या दृष्टिकोनातूनही उत्तम मानले जाते. घरात बनवताना मसाले, तेल आणि मीठ यांचे प्रमाण नियंत्रित करता येते, तसेच स्वच्छतेची विशेष काळजी घेता येते. यामुळे बाजारातील रेडिमेड लोणच्यांपेक्षा घरगुती लोणच्याला जास्त पसंती मिळते. यंदा अवकाळी पावसामुळे कैरीचे उत्पादन कमी झाले आहे, आणि त्याचा परिणाम बाजारातील दरांवर दिसून येत आहे.

### कैरीचे बाजारातील दर

बाजारपेठेत सध्या लोणच्यासाठी लागणाऱ्या कच्च्या कैऱ्यांचा सरासरी दर ६० रुपये प्रति किलो आहे. काही ठिकाणी विक्रेते कैरी फोडून देण्याची सुविधा देतात, आणि त्यासाठी १५ ते २० रुपये प्रति किलो इतके शुल्क आकारले जाते. मोठ्या प्रमाणात कैरी



खरेदी करणाऱ्या ग्राहकांना काही विक्रेते सवलतही देतात. अनेक गृहिणी घरीच कोयता फोडून आपल्याला हव्या त्या आकारात कैरीच्या फोडी तयार करतात, ज्यामुळे त्यांना खर्चात बचत होते आणि लोणच्याचा दर्जाही नियंत्रित राहतो. मसाले, खाद्यतेल आणि इतर सामग्रीसह एक किलो लोणचे बनवण्याचा खर्च साधारण ३०० ते ४०० रुपये इतका येतो. बाजारात रेडिमेड लोणच्याचा दरही ब्रँडनुसार ३०० ते ४०० रुपये प्रति किलो आहे, पण घरगुती लोणच्याची चव आणि आरोग्यदायी गुणवत्ता यामुळे गृहिणी घरीच लोणचे बनवण्याला प्राधान्य देतात.

### लोणच्यासाठी कैरीची निवड

लोणच्यासाठी वापरल्या जाणाऱ्या कैऱ्या कडक, आंबट आणि पूर्णपणे कच्च्या असाव्यात. पिकलेल्या किंवा मऊ कैऱ्या लोणच्यासाठी योग्य ठरत नाहीत. लोणच्याच्या कैऱ्या साधारणपणे गोलाकार, मध्यम आकाराच्या आणि गडद हिरव्या रंगाच्या असतात. अहिल्यानगरात गावरान आंब्याच्या झाडांपासून मिळणाऱ्या कैऱ्यांना विशेष मागणी आहे, कारण त्यांची चव तीव्र आंबट आणि लोणच्यासाठी उत्तम असते. गृहिणी अशा कैऱ्या निवडण्यासाठी विशेष काळजी घेतात, जेणेकरून लोणच्याची चव आणि टिकाऊपणा उत्तम राहील. बाजारातून खरेदी करताना काही गृहिणी कैऱ्यांची गुणवत्ता तपासूनच खरेदी करतात, तर काही घरीच कोय फोडून आपल्या आवडीप्रमाणे फोडी तयार करतात.

### घरगुती लोणच्याची खासियत

घरगुती लोणचे बनवण्याची प्रक्रिया केवळ चवीनेच नव्हे, तर आरोग्याच्या दृष्टिकोनातूनही फायदेशीर आहे. बाजारातील रेडिमेड लोणच्यांमध्ये दीर्घकाळ टिकवण्यासाठी काही रासायनिक घटकांचा वापर केला जाऊ शकतो, ज्यामुळे त्यांची चव नैसर्गिक राहत नाही आणि आरोग्याला धोका निर्माण होऊ शकतो. याउलट, घरगुती लोणच्यामध्ये मसाले, तेल आणि मीठ यांचे प्रमाण नियंत्रित करता येते, तसेच स्वच्छतेची खात्रीही करता येते. गृहिणी सांगतात की, घरच्या लोणच्याची चव आणि टिकाऊपणा याला बाजारातील लोणचे पर्याय तोड देऊ शकत नाही. यामुळे अनेक कुटुंबे दरवर्षी लोणच्याचा हंगाम साजरा करतात आणि आपल्या पारंपरिक रेसिपींचा वापर करून स्वादिष्ट लोणचे तयार करतात.

यावर्षी अवकाळी पावसाने कैरीच्या उत्पादनावर मोठा परिणाम केला आहे. सततच्या पावसामुळे अनेक ठिकाणी कैऱ्या गळून पडल्या, तर काही ठिकाणी उत्पादन कमी झाले. यामुळे बाजारात कैरीचे दर गेल्या वर्षीच्या तुलनेत वाढले आहेत. गेल्या वर्षी कैरीचा दर ४० ते ५० रुपये प्रति किलो होता, पण यंदा तो ६० रुपये प्रति किलोपर्यंत गेला आहे. या दरवाढीमुळे गृहिणींना लोणचे बनवण्याचा खर्चही काहीसा वाढला आहे. तरीही, घरगुती लोणच्याची चव आणि परंपरा जपण्यासाठी गृहिणी दरवाढीकडे दुर्लक्ष करून खरेदी करत आहेत.

# अधिकाऱ्यांना उलटे टांगण्याची धमकी अन् लाभार्थ्यांच्या खात्यात झाले पैसे जमा

## शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या नेतृत्वात लाभार्थी धडकले पंचायत समितीवर




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६ दर्यापूर**

दर्यापूर पंचायत समिती अंतर्गत तालुक्यातील सर्वच गावात मोठ्या प्रमाणावर घरकुल योजनेचा नागरिकांना लाभ मिळत असून या लाभार्थ्यांना प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना,शबरी आवास योजना या योजनेच्या माध्यमातून लाभ देण्यात आला.पण अनेक लाभार्थ्यांना या योजनेचे धनादेश वेळेवर मिळत नसल्याने अनेकदा पंचायत समिती येथे चकरा माराव्या लागत होते व ग्रामीण गृह निर्माण अभियंता वेळोवेळी उडवाउडवीची उत्तरे देत असल्याचे असंख्य तक्रारी शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या जनसंपर्क कार्यालयात आल्याने त्यांनी आज दिनांक २६ मे रोजी जवळपास ४०० लाभार्थी यांना सोबत घेत पंचायत समिती कार्यालयावर धडक मोर्चा काढला व समस्यांचा पाढा गटविकास अधिकारी यांच्या समोर मांडला.यावेळी उपस्थित लाभार्थ्यांच्या समस्या आताच पूर्ण व्हाव्या यासाठी गोपाल पाटील अरबट यांनी आक्रमक होत अधिकाऱ्यांना उलटे टांगण्याची धमकी देत तात्काळ समस्या सोडविण्याची मागणी केली. त्यामुळे काही वेळातच या लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे जमा होण्याचं सुरवात झाली असून त्यांचे सर्व समस्यांचे निराकरण करण्यात आले असून सर्वच लाभार्थ्यांचे सदर रक्कम खात्यात जमा होईल असे गटविकास अधिकारी यांचे समोर नरेगा कर्मचारी व ग्रामीण गृह निर्माण अभियंता यांनी दिले.शिवसेना जिल्हाप्रमुख गोपाल पाटील अरबट यांच्या या प्रयत्नाचे सर्वत्र कौतुक होत आहे.सर्व लाभार्थ्यांनी त्यांचे आभार मानले.

# 'वन नेशन वन इलेक्शन' अजेंडा देशाला फायदेशीर : आ. रवि राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाचा पाठिंबा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.२६मुंबई**

मुंबईत ताज पॅलेस हॉटेल येथे पी पी चौधरी यांच्या अध्यक्षतेत तर समितीचे सदस्य अनुराग ठाकूर, संबित पात्रा, सुप्रिया सुळे, श्रीकांत शिंदे, बासुरी स्वराज्य, धर्मेंद यादव, कल्याण बॅनर्जी व खासदार असलेल्या सदस्यांचे प्रमुख उपस्थितीत आयोजित बैठकीत आ. रवी राणा यांनी युवा स्वाभिमान पक्षाचे वतीने सहभागी होवून वन नेशन वन इलेक्शन अजेंडा देशाला



फायदेशीर असल्याचे सांगत पाठिंबादर्शविला दरवर्षी आणि कधीकधी वर्षभरात वेगवेगळ्या वेळी निवडणुका घेतल्या जातात. ज्यामुळे मोठ्या प्रमाणात सरकारी खर्च. सुरक्षा दलांना आणि निवडणुकांमध्ये गुंतलेल्या निवडणूक अधिकाऱ्यांना त्यांच्या प्राथमिक कर्तव्यापासून दूर करणे आदर्श आचारसंहिता लागू झाल्यामुळे विकास कामामध्ये व्यत्यय येणे. इत्यादी समस्या उद्भवतात. ज्या मुळे निवडून आलेल्या लोकप्रतिनिधींना पाहिजे तसे विकासकाम करता येत नाही. म्हणून पंतप्रधान मोदींचा वन नेशन वन इलेक्शन या मिशनला राष्ट्रीय युवा स्वाभिमान पार्टीच्यावतीने पाठिंबा दिला आहे. यावेळी संदीप ससे, उमेश ढोणे, आदित्य चतुर्वेदी, प्रशांत पवार, आशिष कटरे आदी वायएसपीचे पदाधिकारी उपस्थित होते. सोबतच राज्यातील काँग्रेस पक्षाच्या नेते माजी मुख्यमंत्री पूर्णवीराज चव्हाण, आ. अतुल भातखळकर, समाजवादी पक्षाचे कडून आ. अबू आजमी, यांनी आपआपले मत समितीसमोर नोंदवले.